## राज्यातील विविध जिल्ह्यांना चार दिवसांसाठी यलो अलर्ट




**मुंबई** : येथील वेधशाळेने पुढील चार दिवसांसाठी हवामानाचा अंदाज जाहीर केला असून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाने राज्यात परतीचा पाऊस जोरदार कोसळण्याचा अंदाज वर्तवला आहे. बंगालच्या खाडीत तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे २२ सप्टेंबरपासून राज्यात पावसाचा जोर टप्प्याटप्प्याने वाढणार आहे. विदर्भ, कोकण, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात दमदार पाऊस पडणार आहे. विविध जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने सुकणाऱ्या पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. दरम्यान, यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होत असताना आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ६६
www.ramprahar.com

◆ मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

गणेशोत्सवाला 'युनेस्को'चा दर्जा मिळवण्यासाठी मोहीम/३
रोहा रेल्वेस्थानक होणार हायटेक! केंद्राकडून निधी/५
मुरूडमध्ये गणेशोत्सवातून अवतरला शिवकाळ/७

# महाराष्ट्रासाठी जागतिक कार्यबल गतीशिलता धोरण २०२६ जाहीर

## युवक-युवतींना रोजगाराकरिता सक्षम करणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक रोजगाराच्या बदलत्या गरजांनुसार महाराष्ट्रातील युवक-युवतींना कौशल्य आणि भाषा प्रशिक्षण देऊन आंतरराष्ट्रीय रोजगारासाठी सक्षम करण्यात येत आहे. विविध देशांची कुशल मनुष्यबळाची गरज ओळखून देशनिहाय 'स्किल पासपोर्ट' तयार करावा. औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अन्य प्रशिक्षण संस्थांनी अभ्यासक्रम अद्ययावत करावा तसेच महाराष्ट्रासाठी जागतिक कार्यबल गतीशिलता धोरणांतर्गत परदेशातील रोजगारासाठी सुरक्षित भरती व्यवस्था विकसित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलतेवरील एकदिवसीय उच्चस्तरीय परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), राजशिष्टाचार विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड अॅडव्हान्समेंट (महिमा) यांनी संयुक्तपणे या परिषदेचे आयोजन केले होते.



यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जागतिक स्तरावरील बदलती लोकसंख्या आणि वाढते वृद्धत्व यामुळे कुशल मनुष्यबळाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. भारतातील युवा मनुष्यबळाची क्षमता लक्षात घेऊन जागतिक मागणीशी कुशल मनुष्यबळाची प्रभावी सांगड घालावी लागेल. त्यातून 'सर्क्युलर मोबिलिटी ऑफ टॅलेंट' ही संकल्पना अधिक सक्षम होईल आणि महाराष्ट्र या क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल.

विविध देशांच्या मनुष्यबळविषयक गरजांची माहिती प्रशिक्षण संस्थांपर्यंत पोहचवण्यासाठी भरती संस्थांच्या अनुभवाचा उपयोग करावा. पारंपरिक प्रशिक्षणासह डिजिटल आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा संमिश्र वापर करावा. ऑनलाइन भाषा प्रशिक्षणासाठी निश्चित कालावधी, किमान चाचण्या तसेच डिजिटल भाषांतर आणि इंटरप्रिटेशन साधनांचा उपयोग करावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

### २८ देशांसोबत कामगार करार

भारताने सुमारे २८ देशांसोबत कामगार गतिशीलतेसंदर्भात करार केले आहेत. या देशांमध्ये अभियांत्रिकी, आरोग्यसेवा, बांधकाम आणि विविध तांत्रिक क्षेत्रांतील कुशल मनुष्यबळाला मोठी मागणी आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या 'फ्युचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५'नुसार २०३०पर्यंत जगभरात सुमारे १७ कोटी नवीन रोजगार निर्माण होतील, तर सुमारे नऊ कोटी २० लाख रोजगार विस्थापित होण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय कार्यबल गतिशीलतेच्या क्षेत्रात पुढाकार घेईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.


राज्य शासनाच्या धोरण मसुद्यात कौशल्य विकास, जागतिक मागणीनुसार प्रशिक्षण, भाषा प्रशिक्षण, प्रमाणपत्र, कागदपत्रांसाठी सहाय्य आणि प्रस्थानपूर्व मार्गदर्शनाला प्राधान्य दिले आहे. परदेशातून परतलेल्या कुशल मनुष्यबळाला राज्यातील उद्योगांशी जोडण्यावरही शासन भर देईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल म्हणाले की, आंतरराष्ट्रीय कामगार गतिशीलता ही केवळ मनुष्यबळाच्या स्थलांतराची प्रक्रिया नसून कौशल्य, गुंतवणूक, प्रवासी भारतीय समुदाय आणि जागतिक बाजारपेठेला जोडणारी आर्थिक भागीदारी आहे. मुंबईतील परदेशी वाणिज्य दूतावासांचे नेटवर्क, उद्योग, विद्यापीठे आणि कौशल्य विकास संस्थांचा समन्वय साधून महाराष्ट्रातील प्रतिभेला जागतिक संधींशी जोडण्यात येईल.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले की, जागतिक रोजगारासाठी आवश्यक कौशल्य आणि भाषा प्रशिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना संबंधित देशातील स्थानिक संस्कृतीशी समरस होण्यासाठी सक्षम करण्यावर शासन भर देत आहे. परदेशात जाणारे कामगार महाराष्ट्र आणि संबंधित देशांमधील मैत्री अधिक दृढ करणारे दूत म्हणूनही भूमिका बजावतील.

यावेळी जर्मनीचे वाणिज्यदूत क्रिस्टॉफ हेलियर, जपानच्या सातो हितोमी, फ्रान्सचे पॅट्रीक लिवेरिनो, रशियाचे इव्हॉन पेटीसोव, इंग्लंडचे जॉन निकेली, 'मित्राचे उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे अपर मुख्य सचिव निरंजन कुमार सुधांशू, राष्ट्रीय कौशल्य मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुणकुमार पिलाई, आयुक्त डॉ. अमित सैनी, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांडे, 'मित्रा'चे सहसचिव अमन मित्तल आणि आंतरराष्ट्रीय रोजगार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील युवक युवतींना परदेशातील रोजगार संधी सुलभ व्हाव्यात आणि भाषिक अडचणी दूर व्हाव्यात यासाठी केंद्र शासनाचा डिजिटल इंडिया भाषिणी, मित्रा आणि महिमा यांच्यात सामंजस्य करार झाला.



**पनवेल : ओंकार मित्र मंडळाचा गणराय अर्थात पनवेलचा ओंकारेश्वर यंदा खंडोबाच्या रूपात साकारला आहे. हा बाप्पा भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.**

## रायगडात पावसाची जोरदार हजेरी

**अलिबाग : प्रतिनिधी**



गेले काही दिवस ऊन-पावसाचा लपंडाव सुरू असताना सोमवारी (दि.२१) सायंकाळी रायगड जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली असली तरी शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

गणेशोत्सवाच्या आधी व नंतर दोन दिवस पडणाऱ्या पावसाने नंतर काहीशी विश्रांती घेतली होती. अधूनमधून रिमझिम पाऊस सोडल्यास ऊन पडत होते. सोमवारी सकाळीही असेच चित्र असताना दुपारनंतर ढग दाटून आले आणि अंधारले. मग विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाने बरसात केली. त्यामुळे नागरिकांची विशेषतः नोकरदार आणि विद्यार्थ्यांची तारांबळ उडाली.

**ठाण्यात वीज पडून एकाचा मृत्यू**

**शहापूर** : ठाणे जिल्ह्यात सोमवारी (दि.२१) रात्री विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस झाला. यादरम्यान शहापूर येथील कुंभारपाडा परिसरात वीज कोसळल्याने रोहित मेंगाळ (१९) या तरुणाचा मृत्यू झाला. रोहित हा गावालगतच्या जंगलात गेला होता. यावेळी वीज कोसळल्याने तो गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याला शेंदूण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी शहापूर उपजिल्हा रुग्णालयात नेत असताना त्याचा मृत्यू झाला.

## संवेदनशील वाढदिवस..



**पनवेल : भाजपचे युवा नेते अमर ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून कळंबोली येथील सुधागड शाळेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या वार्षिक शैक्षणिक फीचा खर्च उचलण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सुमारे एक लाख रुपयांचा धनादेश भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सुधागड शाळेचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्याकडे रविवारी सुपूर्द करण्यात आला. यावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, शिवसेना जिल्हाध्यक्ष नगरसेवक रामदास शेवाळे, नगरसेविका मीनल ठाकूर, बायजा बारगजे, मोनिका महानवर, रविशेठ पाटील आणि शिक्षक उपस्थित होते.**

## राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम राज्यात लागू होणार

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील सहयोगी आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि नियमन अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य सहयोगी व आरोग्यसेवा परिषदेच्या कामकाजाला गती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर परिषदेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७पासून महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

आरोग्यसेवा क्षेत्रातील शिक्षण आणि कामकाजात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी परिषदेअंतर्गत चार स्वायत्त मंडळे स्थापन करण्यात येणार आहेत. त्यामध्ये पदवीपूर्व सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, पदव्युत्तर सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय मूल्यांकन व मानांकन मंडळ तसेच सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय आचारसंहिता व नोंदणी मंडळ यांचा समावेश आहे.

## निवडक

### सोनिया गांधींना कोर्टाचा धक्का!

**नवी दिल्ली :** दिल्लीतील राऊज अॅव्हेन्यूच्या विशेष न्यायालयाने काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासंदर्भातील मॅजिस्ट्रेट कोर्टाचा जुना आदेश रद्द केला आहे. सोनिया यांचे नाव १९८३मध्ये भारतीय नागरिकत्त्व मिळण्याच्या तीन वर्षांपूर्वीच मतदार यादीत समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप आहे. न्यायालयाने हे प्रकरण दंडाधिकाऱ्यांकडे परत पाठवले, जेणेकरून ते नव्याने युक्तिवाद ऐकून सकारण आदेश देऊ शकतील.

### सूर्यनारायण दुल्लांचे डीनपद निलंबित

**मुंबई :** आयआयटी बॉम्बे येथील ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या आत्महत्येनंतर संस्थेने मोठी कारवाई केली आहे. आयआयटी बॉम्बेचे संचालक शिरीष केदारे यांनी प्रा. सुर्यनारायण दुल्ला यांचे अधिष्ठाता (डीन) पद तत्काळ प्रभावाने निलंबित केले आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी नवीन पनवेल से. ८मधील अष्टविनायक मित्र मंडळाच्या 'पनवेलचा विघ्नहर्ता'चे दर्शन घेतले. मंडळाचे अध्यक्ष अमित जाधव व सहकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी जी.के. सुर्वे, संगीत म्हात्रे, मुकेश कदम, निहाल सिंग, प्रदीप चव्हाण, प्रणय परुळेकर आदी उपस्थित होते.**

दै. रामप्रहर दिवाळी अंक २०२६

पिढ्यांच्या पाऊलखुणा...

रामप्रहर

दिवाळी अंकांना महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक विश्वात समृद्ध परंपरा लाभली आहे. 'रामप्रहर'नेही ही परंपरा सातत्याने जपली आहे. यंदाच्या दिवाळी अंकासाठी विविध क्षेत्रातील पिढ्यांचा प्रवास हा विषय घेण्यात आला आहे. या मुख्य विषयासोबतच अंकात कथा, कविता, व्यंगचित्रे, लेख, ललित लेखन अशा विविध साहित्यप्रकारांचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे लेखनाची आवड असलेल्या साहित्यिक, लेखकांना या दिवाळी अंकाच्या माध्यमातून आपले साहित्य वाचकांपर्यंत पोहचवण्याची संधी मिळणार आहे.
प्राप्त साहित्याचा यथायोग्य विचार करून दिवाळी अंकासाठी निवड करण्यात येईल.

आपले साहित्य ७ ऑक्टोबरपर्यंत टाइप करून
ramprahar@gmail.com
या ई-मेलवर पाठवावे.

# लोकसंवाद अभियानातून रोजगाराच्या संधी

## राज्यात २९ सप्टेंबरला एक हजार रोजगार मेळावे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत २९ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एक हजार रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' रोजगार मेळाव्यांमध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

माहिती व जनसंपर्क विभागाच्या 'लोकसंवाद२०२६' अभियानांतर्गत गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगरातील विविध गणेश मंडळांमध्ये नागरिकांशी संवाद साधून रोजगार मेळावे आणि उपलब्ध रोजगाराच्या संधींबाबत माहिती देण्यात आली.

मलबार हिल येथील मीनल क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रशांत जाधव, उपाध्यक्ष निंगेश कोरे, राजीव मेहता, सागर पेंढारक, आयेशा कुरेशी इतर पदाधिकारी, सदस्य व भक्तगण यावेळी उपस्थित होते. यावेळी मुंबई शहर जिल्ह्यातील रोजगार मेळाव्याबाबत कौशल्य विकास अधिकारी विद्या शिंगे, समन्वयक अजय कांबळे, तसेच माहिती व जनसंपर्क विभागाच्या विभागीय संपर्क अधिकारी संध्या गरवारे,



श्रद्धा मेश्राम आणि अश्विनी पुजारी यांनी नागरिकांशी संवाद साधून रोजगार महाकुंभाची माहिती दिली.

राज्यातील युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य आणि आवडीनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. प्रत्येक तालुक्यात रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून स्थानिक युवकांना विविध आस्थापना व उद्योगांमधील रोजगाराच्या संधींची माहिती मिळणार आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या प्रमुख योजनांबाबत जनजागृती

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, नवबौद्ध, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तृतीयपंथीय तसेच इतर दुर्बल घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. मॅट्रिकोत्तर, सावित्रीबाई फुले व राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य दिले जाते. स्वाधार व शासकीय वसतिगृह योजनांतून निवास व आवश्यक सुविधा उपलब्ध होतात. रमाई आवास योजनेतून घरकुलासाठी आर्थिक सहाय्य, तर मुख्यमंत्री वयोश्री व संजय गांधी निराधार योजनेतून ज्येष्ठ नागरिक आणि निराधारांना आधार दिला जातो.या योजनांद्वारे शिक्षण, निवास, आर्थिक सहाय्य व सामाजिक सुरक्षेला बळ देत दुर्बल घटकांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती लोकसंवाद अभियान अंतर्गत देण्यात आली.

महिला व बालकांच्या संरक्षण, पोषण, शिक्षण व सक्षमीकरणासाठीच्या विविध योजना आणि सेवांची माहिती

महिला व बालकांच्या संरक्षण, पोषण, शिक्षण, सक्षमीकरण आणि पुनर्वसनासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत विविध योजना व सेवा राबविण्यात येतात. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, वन स्टॉप सेंटर, शक्ती सदन, आदर्श अंगणवाडी, बेबी केअर किट, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना आणि पोषण अभियान या योजनांच्या माध्यमातून महिला व बालकांना विविध स्वरूपाचे सहाय्य दिले जाते.

अंगणवाडी सेवांद्वारे पूरक पोषण, आरोग्य तपासणी, लसीकरण, पूर्व-प्राथमिक शिक्षण तसेच पोषणविषयक मार्गदर्शन दिले जाते. महिलांच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत समुपदेशन व कायदेशीर मार्गदर्शन, तर बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी तक्रारींवर कार्यवाही केली जाते. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गट, कौशल्यविकास आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यात येते. महिला हेल्पलाईन १५५२०९ आणि बाल हेल्पलाईन १०९८ या सुविधांबाबतही यावेळी माहिती देण्यात आली.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येत असल्याने त्याच ठिकाणी शासकीय योजनांची माहिती थेट पोहोचविण्याचा हा अभिनव उपक्रम नागरिकांसाठी उपयुक्त ठरत असून, त्यांच्या प्रश्नांना संबंधित अधिकाऱ्यांकडून तत्काळ मार्गदर्शन मिळत असल्याने 'लोकसंवाद' उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त

# रोह्यात रक्तदानातून सेवाभाव



**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यात सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणारा उपक्रम राबविण्यात आला. भाजपा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या रविवारी दि. (२१) रोजी रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत तब्बल ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छा आणि सत्कार न ठेवता, त्याचे रूपांतर समाजोपयोगी उपक्रमात करण्याचा संदेश या रक्तदान शिबिरातून देण्यात आला. 'रक्तदान हेच जीवनदान' या भावनेतून आयोजित या उपक्रमात तरुणांसह नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

भाजपा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली रोहा तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. सामान्य जनतेशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी, गरजा आणि सामाजिक प्रश्नांशी जोडलेले राहण्याच्या भूमिकेतून विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

पक्षाचे कार्य केवळ राजकीय चौकटीपुरते मर्यादित न ठेवता समाजाच्या उपयोगी पडणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली सुरू असल्याचे या उपक्रमातून दिसून आले. रक्तदान शिबिराला मिळालेला प्रतिसाद हा सामाजिक कार्याला नागरिकांकडून मिळणाऱ्या सहकार्याची पावती ठरला. या शिबिराला पशु संवर्धन व कृषी सभापती वैकुंठ पाटिल यांनी भेट दिली .

यावेळी जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, नगरसेवक रोशन चाफेकर, सरचिटणीस कृष्णा बामणे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रिया कासार, शहराध्यक्ष मृणाल पेंडसे, परेश चितलकर, शैलेश रावकर, ज्ञानेश्वर जाधव, दीपक मोरे, निलेश जंगम, संदेश जंगम, हाजी कोठारी, वैभव कुलकर्णी, धनश्री बापट, जयश्री भांड, महेश मोहिते, दीपक कोल्हटकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.रक्तदान करणाऱ्या ५१ रक्तदात्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून 'सेवा, सामाजिक बांधिलकी आणि जनसंपर्क' यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

# महापे येथील ऐतिहासिक बुरुजाला पुरातत्व विभागाची मान्यता

**नवी मुंबई : बातमीदार**

महापे-पावणे एमआयडीसी, भूखंड क्र. ५०/२ येथील ऐतिहासिक दगडी बुरुज/संरचनेबाबत पुरातत्व विभागाच्या अहवालानुसार ही वास्तू पोर्तुगीजकालीन (इ.स. १६वे ते १८वे शतक) असून नवी मुंबईच्या स्थानिक पुरातत्त्वीय व ऐतिहासिक वारशाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

वास्तूचा संभाव्य उपयोग टेहळणी बुरुज, चेकपोस्ट किंवा संदेशवहनासाठी झालेला असण्याची शक्यता अहवालात व्यक्त करण्यात आली आहे तसेच या परिसरातील ऐतिहासिक वारशाच्या अभ्यासासाठी हा शोध अत्यंत महत्त्वाचा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. नवी मुंबईमधील कोपरखैराणे,महापे, मुंब्रा या गावाचे नाव कसे पडले तसेच त्याचे ऐतिहासिक महत्व यात नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, पुरातत्व विभागाने या वास्तूला स्थानिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्याच्या दर्जाचे असल्याचे स्पष्ट केले आहे आणि संरक्षण व संवर्धनासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणेला आवश्यक कार्यवाही करण्याचे सुचवले आहे.या ऐतिहासिक संरचनेचा शोध घेऊन तिचे महत्त्व प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचे काम संकेत नारायण डोके, अध्यक्ष नवी मुंबई विकास अधिष्ठान यांनी केले आहे. ३ जून रोजी याच संरचनेच्या संरक्षणासाठी पुरातत्व विभागाकडे पत्राद्वारे मागणी केली होती.

**पुरातत्व विभागाच्या अहवालामुळे या ऐतिहासिक वारशाच्या संरक्षणाच्या प्रयत्नांना अधिकृत आधार मिळाला आहे. नवी मुंबईच्या इतिहासाची ही महत्त्वपूर्ण खूण जतन होण्यासाठी पुढील संरक्षणात्मक कार्यवाही तातडीने व्हावी, हीच मागणी.**
**-संकेत डोके, अध्यक्ष, नवी मुंबई विकास अधिष्ठान**

# गणेश विसर्जनावेळी पोलादपूर शहरातील मुख्य रस्त्यांवर अंधार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पाच दिवसांच्या काळात पोलादपूर शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अनेक स्ट्रीट लाईट बंद असल्याने नागरिकांसह गणेशभक्तांना अंधारातून मार्गक्रमण करावे लागत असल्याचे दिसून आले. उत्तर वाहिनी सावित्री नदीच्या घाटावर विसर्जन काळात कंत्राटी कामगार निर्माल्य संकलनासाठी सर्वत्र तत्पर असल्याचे दिसत होते.



गणेशोत्सव हा शहरातील सर्वाधिक गर्दीचा ठरत असताना मुख्य रस्त्यांवरील स्ट्रीट लाईट सुरू ठेवणे, बंद दिव्यांची तातडीने दुरुस्ती करणे आणि पेस्ट कंट्रोल करून नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे ही कामे नगरपंचायतीकडून अपेक्षित असताना पाच दिवसांच्या गणेशोत्सवादरम्यान काही मुख्य रस्ते अंधारवाटा झाल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होऊ लागली. अनेक महिने नगरपंचायतीकडून स्ट्रीट लाईटचे विद्युत देयकापोटीची रक्कम जमा केली नसल्याने शहरातील प्रमुख रस्ते अंधारात ठेवले होते. दीड दिवसांच्या गणपतींचे विसर्जन काळोखात झाले; त्यावेळी काळोखात विसर्जन करणाऱ्या कुटुंबांना दाद न देणाऱ्या नगरपंचायत प्रशासनाने पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन काळोखात होऊ नये याची दक्षता घेण्याची अपेक्षा होती. मात्र, रस्ते काळोखात ठेवून नगरपंचायत प्रशासनाने श्रीदेवी गंगामाता घाट, पिंपळपारालगतचा घाट, गणेश मंदिरासमोरील घाट, सातीआसरालगतचा घाट येथे याठिकाणी तात्पुरती प्रकाशझोताची योजना करण्यात आली.

पोलादपूर शहरातील साफसफाई व शहर स्वच्छता खासगी ठेकेदार करीत असताना दीड दिवसांच्या गणपतींचे आणि पाच दिवसांच्या गौरी गणपती विसर्जनाच्या ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी कंत्राटी कामगारांना नियुक्त करण्यात आले. सावित्री आणि चोळई नदीच्या संगमावर सावित्री नदीमध्ये थेट कचरा सोडणाऱ्या नगरपंचायत प्रशासनाने निर्माल्य नदीत जाण्याआधीच गोळा करून ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र, बाप्पाच्या शिदोरीच्या प्लास्टिक पिशव्या आधीपासूनच सावित्री नदीच्या पात्रात तरंगत असल्याचे पाहण्यास मिळाले. हरित लवादाने नोटीस बजावल्याने नगरपंचायतीकडून निर्माल्य नदीत जाण्याआधीच गोळा करण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

नागरिकांवर वाढीव घरपट्टीचा आर्थिक भार टाकण्यात आला असताना पोलादपूर शहरातील स्ट्रीट लाईट बंद ठेवण्यासोबत निर्माल्य संकलनासाठीचा केविलवाणा प्रयत्न सर्वच नगरसेवकांनी दूर्लक्षित केला आहे.

# रोहा पोलिसांनी मुंब्र्यात जाऊन बैलचोरीतील आरोपीला पकडले

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या बैलचोरीच्या गुन्ह्याचा छडा लावताना रोहा पोलिसांनी दाखवलेल्या धाडसाचे आणि तपासकौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. गुन्ह्यातील संशयित आरोपीचा शोध घेण्यासाठी रोहा पोलिसांचे पथक थेट मुंब्रा परिसरात पोहोचले आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन रोह्यात आणण्यात यश मिळवले.

रोहा पोलीस ठाण्यात १० ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक २५१/२०२६, बीएनएस कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपी विरुध्द बैलचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासादरम्यान घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले. त्यामध्ये दिसणाऱ्या संशयित इसमाची गुप्त बातमीदारांमार्फत माहिती घेण्यात आली. त्यातून संशयित इसम हा फजल आयुब कुरेशी, रा. मुंब्रा, जि. ठाणे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर त्याचा मोबाईल क्रमांक मिळवून तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून पोलिसांनी त्याच्या हालचालींचा माग काढला. वरिष्ठांच्या आदेशानुसार १७ सप्टेंबर रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल बेल्हेकर, पोलीस शिपाई चाळेकर, पोलीस शिपाई



पाटील आणि चालक पोलीस हवालदार झावरे यांचे पथक मुंब्रा येथे रवाना झाले.

मुंब्रा हा रोहा पोलिसांसाठी अपरिचित आणि जोखमीचा परिसर असतानाही पथकाने स्थानिक मुंब्रा पोलिस ठाणे तसेच रायगड सायबर पोलिसांच्या मदतीने आरोपीचा शोध सुरू ठेवला. अखेर १८ सप्टेंबर रोजी आरोपीचा ठावठिकाणा निश्चित करून त्याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले.विशेष म्हणजे हा आरोपी विविध गुन्ह्यामध्ये पोलीस रेकॉडला असल्याने तो त्याचा राहण्याचा ठाव ठिकाणा नेहमी बदलत असायचा चौकशीदरम्यान आरोपीने आपल्या साथीदारांसह सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्याने बैलचोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. आरोपीला पुढील तपासासाठी अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला २३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

गुन्ह्याचा तपास केवळ कागदोपत्री न ठेवता सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाचा प्रभावी वापर करत थेट मुंब्रा परिसरात जाऊन आरोपीला ताब्यात घेण्याची कारवाई रोहा पोलिसांनी केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याची उकल होण्यास मोठी मदत झाली.

# खोपोलीत केरळ कल्चरल सोसायटीतर्फे ओणम उत्सव उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

केरळ कल्चरल सोसायटी खोपोली यांच्या वतीने रविवार २० सप्टेंबर रोजी ओणम उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. यंदाचा उत्सव केवळ सायंकाळपुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण दिवसाचा कौटुंबिक सोहळा म्हणून आयोजित करण्यात आला होता. मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील श्री समर्थ कृपा हॉटेलजवळील श्री समर्थ मंगल कार्यालय येथे हा कार्यक्रम पार पडला.




या उत्सवाला कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे, खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, नगरसेवक दिनेश थोरवे, नगरसेवक राहुल गायकवाड आदी प्रमुखांसह मोठ्या समाज बांधव उपस्थित होते. तर सोहळा यशस्वी करण्यासाठी केरळ कल्चरल सोसायटीचे अध्यक्ष साहिद चंद्रन, उपाध्यक्ष उन्नीकृष्णन नायर, सचिव सुनील पिल्लई, खजिनदार पी.के.प्रभू, सहसचिव जॉन डॅनियल वर्गिस, राहुल हरि, सहखजिनदार राजू नायर यांच्यासह सर्व कार्यकारी सदस्य आणि समाज बांधवांनी मेहनत घेतली.

ओणमच्या निमित्ताने दिवसभर विविध सांस्कृतिक, मनोरंजनात्मक आणि कलाविष्कारांचे कार्यक्रम सादर करण्यात आले. दुपारच्या सत्रात आयोजित करण्यात आलेला विशेष गानमेळा हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. केरळच्या समृद्ध परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध कार्यक्रमांसोबतच समाजातील कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. केरळ कल्चरल सोसायटीचे सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने सहभागी होत उत्सवाचा आनंद घेतला असून यावेळी बोलताना आमदार महेंद्र थोरवे यांनी केरळ समाज बांधवांच्या एकोप्याचे आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. समाज बांधवांनी आपला हा एकोपा आणि बंधुभाव कायम असाच जपावा, असे आवाहन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.

# रायगड जिल्ह्यात २९ सप्टेंबरला रोजगार महाकुंभ मेळावे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग कार्यालयामार्फत जिल्ह्यात १२ ठिकाणी "रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र"चे आयोजन करण्यात येत असून याकरिता रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी नोंदणी करुन रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी मुलाखतीकरिता उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत केले.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या जन्मदिवसानिमित्त दि. २९ सप्टेंबर, २०२६ रोजी संपूर्ण राज्यात एकाच दिवशी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत एकाच वेळी ५०० पेक्षा अधिक विविध ठिकाणी रोजगार मेळावे/प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करुन राज्याच्या रोजगार क्षेत्रात एक नवा अध्याय लिहला जाणार आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, हा या उपक्रमांचा मूळ गाभा असून हा उपक्रम राज्यातील जिल्हा, तालुका व औद्योगिक परिसरांमध्ये राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने दि.२९ सप्टेंबर, २०२६ रोजी होणाऱ्या "रोजगार महाकुंभ महाराष्ट्र" अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग कार्यालयामार्फत रायगड जिल्ह्यामध्ये १२ ठिकाणी "रोजगार



महाकुंभाचे आयोजन करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील नामांकीत आस्थापनांकडील विविध रिक्तपदांच्या/ॲप्रेंटिसशिपची भरतीसाठी "रोजगार महाकुंभ-आयोजित केला आहे. सदर मेळाव्यात एस.एस.सी/एच.एस.सी, आय.टी.आय., डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर, फार्मसी पदवीधर व इतर पदवीधारक नोकरी इच्छुक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे.

या विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येईल.या रोजगार मेळाव्याकरीता उमेदवारांसाठी व उद्योजकांसाठी गुगल लिंक/क्युआर कोड विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहे. त्यामार्फत उमेदवारांना व उद्योजकांना नोंदणी करता येईल.

यावेळी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्र.सहायक आयुक्त श्रीकांत पां.कोकाटे, जिल्हा प्रशिक्षण अधिकारी सूर्यवंशी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# गणेशोत्सवाला 'युनेस्को'चा दर्जा मिळवून देण्यासाठी मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या वैभवशाली गणेशोत्सवाला जागतिक स्तरावर 'युनेस्को अमूर्त सांस्कृतिक वारसा' (UNESCO Intangible Cultural Heritage) म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी, राज्य शासनाने ऐतिहासिक मोहिमेचा प्रारंभ केला आहे. या मोहिमेमध्ये रायगड जिल्हा आणि पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे व गृहनिर्माण संस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पनवेल महापालिकेच्या महापौर नितीन पाटील आणि महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला अत्यंत समृद्ध, सामाजिक आणि ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. हा सांस्कृतिक वारसा जागतिक पटलावर पोहोचवण्यासाठी आणि त्याचे दस्तऐवजीकरण (Documentation) करण्यासाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांनी आपल्या घरातील तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाशी

## पनवेलकरांना सहभागाचे आवाहन

जोडलेल्या परंपरा, प्रथा, ऐतिहासिक कथा, कलात्मक सजावट, पारंपरिक खाद्यसंस्कृती तसेच छायाचित्रे व व्हिडियोची नोंदणी करण्याचे सूचित करण्यात आले आहे.

या मोहिमेत सहभागी होऊन आपल्या संस्कृतीचे दस्तऐवजीकरण करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला राज्य शासनाच्या वतीने 'Digital Cultural Preserver Certificate' देऊन गौरवले जाणार आहे. आपली सांस्कृतिक परंपरा जपत महाराष्ट्राच्या या भव्य उत्सवाला जागतिक स्तरावर सन्मान मिळवून देण्यासाठी पनवेल क्षेत्रातील सर्व सामाजिक संस्था, गृहनिर्माण संस्था, सार्वजनिक मंडळे आणि नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**सहभागासाठी नोंदणी प्रक्रिया**

या मोहिमेत सहभागी होण्यासाठी नागरिकांना खालीलपैकी कोणत्याही एका पर्यायाचा वापर करता येईल: QR Code: प्रसिद्ध केलेल्या अधिकृत बॅनरवरील क्यूआर कोड स्कॅन करून. ऑनलाइन पोर्टल: Bappa.org या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन. व्हॉट्सअॅप (WhatsApp): ९१३६१७२६८१ या क्रमांकावर "Hi" असा संदेश पाठवून. माहिती अपलोड करावी.

# पनवेलमध्ये २६, २७ सप्टेंबरला विशेष मतदार नोंदणी शिबिरे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार महाराष्ट्रात विशेष मतदार यादी तपासणी कार्यक्रम-२०२६ सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या काळात मतदार यादीतील चुका, नावे आणि इतर बाबींविषयी अर्ज व हरकती स्वीकारल्या जात आहेत.या पार्श्वभूमीवर १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर २६ आणि २७ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरे घेण्यात येणार आहेत. या दोन्ही दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान केंद्रावरील अधिकारी संबंधित



केंद्रावर उपस्थित राहतील.

या शिबिरांमध्ये मतदार यादीतील चुका दुरुस्त करता येतील. तसेच नवीन मतदारांना नाव नोंदवता येईल. मतदार यादीतून नाव काढण्याची विनंती करता येईल. तसेच पात्र असूनही मतदार यादीत नाव नसलेल्या नागरिकांना नाव नोंदवण्याची संधी मिळेल. या शिबिरांमध्ये बूथ लेव्हल अधिकारी(बीएलओ) मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

नवीन मतदार म्हणून नाव नोंदवण्यासाठी नमुना ६, मतदार यादीतून नाव काढण्यासाठी नमुना ७, तसेच नाव, पत्ता किंवा इतर माहिती दुरुस्त करण्यासाठी नमुना ८ भरता येईल. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे घेऊन आपल्या मतदान केंद्रावर जावे आणि या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरांचे नियोजन करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी आणि पर्यवेक्षकांना देण्यात आल्या आहेत. तसेच, सर्व मतदान केंद्रांवरील अधिकाऱ्यांनी या दिवशी आपल्या नेमून दिलेल्या केंद्रावर उपस्थित राहून मतदार नोंदणी आणि दुरुस्तीचे काम करण्याचे आदेश देण्यात आले आहेत

# तळोज्यातून दोन मुलींसह २८ वर्षीय महिला बेपत्ता



**पनवेल : वार्ताहर**

तळोजा फेज-२ येथील केदार सोसायटी परिसरातून २८ वर्षीय महिला आपल्या दोन अल्पवयीन मुलींसह बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली असून, पोलीस तिघींचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुजाता चंद्रकांत जाधव (वय २८) या आपल्या राहत्या घरातून बाहेर पडल्या. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या दोन मुली स्वरा (वय ७) आणि श्रुती (वय ५) होत्या. घरातून बाहेर पडल्यानंतर तिघीही परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला.नातेवाईक व परिचितांकडे चौकशी करूनही त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी तळोजा पोलीस ठाण्यात खबर दिली.

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार मोहिते हे प्राथमिक तपास अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. तिघींबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास तळोजा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात रायगडच्या सुपुत्रांची भक्तिमय स्वरसेवा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात महाराष्ट्र शासन स्थापित श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित भक्तिमय भजनसेवेत रायगडचे सुपुत्र तथा सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे चिरंजीव आणि भजनसम्राट ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी यांचे नातू गायक मंगेश चौधरी आणि अक्षय चौधरी यांनी आपल्या सुरेल गायनातून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी स्वरसेवा अर्पण केली. अभंग, भजन आणि भक्तिगीतांच्या सुमधुर सादरीकरणाने मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.




श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या गाभारा मंडपात दुपारी १ ते ३ या वेळेत झालेल्या या विशेष भजनसेवेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. गायक बंधू मंगेश चौधरी आणि अक्षय चौधरी यांच्या भक्तिगीत व अभंगांच्या सादरीकरणाने उपस्थित हजारो वारकरी, भाविक आणि संगीतप्रेमी तल्लीन झाले. या स्वरसेवेला पेण-अलिबागचे पखवाज वादक ओंकार म्हात्रे यांनी पखवाजाची साथ दिली. तसेच सुनील म्हात्रे यांनी तबल्यावर, तर प्रकाश म्हात्रे आणि वर्षा म्हात्रे यांनी टाळांवर साथ करत कार्यक्रमाला सुरेल रंगत आणली. गायन आणि वाद्यसंगतीच्या सुंदर मिलाफामुळे संपूर्ण मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

पंढरपूरच्या पावन भूमीत, विठुरायाच्या साक्षीने आणि रुक्मिणी मातेच्या कृपाछायेत झालेल्या या स्वरसेवेदरम्यान 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या नामघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. भक्तिरसपूर्ण अभंग आणि भजनांच्या सादरीकरणाने वारकरी व भाविक भावविभोर झाले. उपस्थितांनी या भजनसेवेचा मनमुराद आनंद घेत विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होत दर्शन घेतले. "श्री विठूरायाच्या चरणी गायन सेवा रुजू करण्याची संधी मिळणे, हा माझ्या आयुष्यातील अत्यंत भाग्याचा आणि अलौकिक क्षण आहे," अशी भावना मंगेश व अक्षय चौधरी या बंधूनी व्यक्त केली.

या भक्तीमय कार्यक्रमास अनेक संगीतसाधक, मंदिर समितीचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. स्वरांनी सजलेली ही गायन सेवा उपस्थितांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील अशीच ठरली. रायगड आणि नवी मुंबईच्या मातीतून संगीतसेवेची परंपरा पुढे नेणाऱ्या या कलाकारांना पंढरपूरच्या पावन नगरीत विठ्ठलाच्या चरणी आपली कला अर्पण करण्याची संधी मिळणे हा आनंदाचा आणि समाधानाचा क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. भक्ती, शास्त्रीय संगीत, अभंग आणि नामस्मरणाचा सुरेल संगम घडवून आणणारी ही स्वरसेवा उपस्थित भाविकांच्या स्मरणात राहिली.

# खारघरकरांना शासकीय आरोग्य योजनांबाबत मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

श्री सिद्धिविनायक सांस्कृतिक मंडळ, स्पॅगेटी, खारघर यांच्या वतीने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तसेच राज्य व केंद्र शासनाच्या विविध वैद्यकीय योजनांबाबत मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती मिळावी, हा या कार्यक्रमामागील उद्देश होता.खारघर-तळोजा कॉलनीज वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष मंगेश रानवडे यांनी विशेष पुढाकार घेत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष, मंत्रालय यांच्याशी समन्वय साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष, मंत्रालय येथील वैद्यकीय समन्वयक डॉ. निखील इंगळे यांनी विविध शासकीय वैद्यकीय योजनांची पात्रता, मिळणारे लाभ, आवश्यक कागदपत्रे तसेच अर्ज करण्याची प्रक्रिया याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी योजनांची माहिती सोप्या भाषेत समजावून सांगत नागरिकांच्या शंकांचे निरसन केले.

कार्यक्रमाला खारघर परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित नागरिकांनी राज्य व केंद्र शासनाच्या वैद्यकीय योजनांशी संबंधित विविध प्रश्न विचारले. डॉ. इंगळे यांनी प्रश्नांना सविस्तर उत्तरे देत योग्य पद्धतीने योजनांचा लाभ कसा घेता येईल, याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री सिद्धिविनायक सांस्कृतिक मंडळाच्या व्यवस्थापन समितीने विशेष परिश्रम घेतले. मंडळाचे प्रमुख पदाधिकारी रविंद्र मानकर, महेश चव्हाण तसेच व्यवस्थापन समितीचे अन्य सदस्य यावेळी उपस्थित होते.

तसेच खारघर-तळोजा कॉलनीज वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने डॉ. बासूतकर आणि आनंद झाने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय समितीच्या सदस्यांनी सुरळीतपणे पार पाडला.शासकीय आरोग्य योजनांची योग्य वेळी माहिती मिळाल्यास गरजू रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना मोठी मदत होऊ शकते.

# पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा २३ सप्टेंबर रोजी नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ, सिडको समाजमंदिर दुसरा मजला नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणारी ही स्पर्धा १४, १७, १९ वर्षाखालील मुले व मुली अशा विविध गटांत खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन मनपा आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते होईल.

विजेत्यांना संजय कडू यांच्यातर्फे आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कामोठ्यात प्रथमच अवतरली 'प्रति जेजुरी'!

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सव म्हणजे केवळ उत्सव नसून भक्ती, संस्कृती आणि समाजाला सकारात्मक दिशा देणारे माध्यम आहे. याच विचारातून शंभो मित्र मंडळ, कामोठे यांनी यंदाच्या सार्वजनिक गणेशोत्सवासाठी आगळावेगळा संकल्प साकारला आहे. पनवेल नगरीत प्रथमच 'प्रति श्री मार्तंड जेजुरी'ची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली असून, 'कामोठ्याचा महाराजा'च्या दर्शनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांना जेजुरीच्या भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेता येणार आहे.

यंदाच्या उत्सवाचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे 'चलचित्रगाथा पुष्प दुसरे'. आजच्या बदलत्या जीवनशैलीत हरवत चाललेली संस्कृती, परंपरा, संस्कार आणि आपल्या मातीशी असलेले नाते यावर भाष्य करणाऱ्या या चलचित्राच्या माध्यमातून समाजाला नवा विचार आणि दिशा देण्याचा प्रयत्न मंडळाने केला आहे.

गणेशोत्सवाची रंगत वाढविण्यासाठी मंडळातर्फे '१२ दिवस, १२ विविध कार्यक्रम' ही संकल्पना राबविण्यात येत आहे. पारंपरिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच सामाजिक उपक्रम आणि विविध स्पर्धांच्या माध्यमातून लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना उत्सवात सहभागी करून घेण्याचे नियोजन करण्यात आले



आहे. विशेषतः पारंपरिक जागरण-गोंधळासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना यामध्ये स्थान देण्यात आले आहे.

या वर्षीच्या '१२ दिवस, १२ विविध कार्यक्रम' उपक्रमाचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे विविध स्पर्धांसाठी तब्बल २ लाख २२ हजार २२२ रुपयांची एकूण भरघोस पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या उत्साहासोबतच विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांमध्येही मोठी उत्सुकता आहे.

# गणेशोत्सवात जागृती पीपल्स असोसिएशन आणि अष्टविनायक मित्र मंडळाची सामाजिक बांधिलकी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील सेक्टर ८ मधील जागृती पीपल्स असोसिएशन व अष्टविनायक मित्र मंडळच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दहा दिवसांचा गणेशोत्सव (पनवेलचा विघ्नहर्ता) विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्यातून समाजोपयोगी उपक्रमांना चालना मिळावी, या उद्देशाने मंडळाच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या आरोग्य शिबिरामध्ये परिसरातील नागरिकांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच आरोग्यविषयक समस्या, आजारांपासून बचाव, नियमित आरोग्य तपासणी आणि निरोगी जीवनशैली याबाबत नागरिकांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी, या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गणेशोत्सवाच्या काळात मंडळाच्यावतीने धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य देण्यात येत असून, समाजातील गरजू घटकांना मदत करणे, नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करणे आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत करणे यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. अष्टविनायक मित्र मंडळाच्या या उपक्रमातून 'उत्सवातून समाजसेवा' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न होत असून, गणरायाच्या उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देण्यात आली आहे. मंडळाच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# काळुंद्रे येथील कांडपिळे परिवाराचा उज्जैन महाकाल भस्म आरती देखावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काळुंद्रे गावातील नारायण आबाजी कांडपिळे यांच्या एकत्र कुटुंबात १०० वर्षांपासून चालत आलेली गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा यावर्षीही अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात साजरी होत आहे. निसर्गाचा समतोल राखत परंपरा जपणारा कांडपिळे परिवार दरवर्षीप्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक उत्सवाचा आदर्श वस्तुपाठ ठरला आहे.

कांडपिळे कुटुंबाची ही शतकोत्तरी परंपरा निसर्गाशी घट्ट जोडलेली आहे. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या पद्धतीनुसार घरात स्थापन केली जाणारी गणेशमूर्ती ही पूर्णपणे शाडूच्या मातीपासून तयार केली जाते, तर गौरी मातेची मूर्ती तेरड्याच्या झाडापासून घडवली जाते. निसर्गाला साजेशा आणि पारंपरिक पद्धतीने साकारलेल्या या मूर्ती भक्तांचे विशेष लक्ष वेधून घेतात.

या १०० वर्षांच्या ऐतिहासिक परंपरेचे औचित्य साधून कांडपिळे परिवाराच्या वतीने यंदा अत्यंत देखणा आणि भक्तिमय "उज्जैनचा महाकाल आणि प्रसिद्ध भस्म आरती" हा भव्य देखावा सादर करण्यात आला आहे. उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरातील भस्म आरतीचा जिवंत अनुभव देणारा हा देखावा पाहण्यासाठी आणि बाप्पाच्या दर्शनासाठी ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत.एकत्र कुटुंब पद्धती टिकवून ठेवत निसर्गपूरक गणेशोत्सव साजरा करणारा कांडपिळे परिवार संपूर्ण परिसरासाठी एक प्रेरणास्थान बनला आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी खांदा कॉलनीतील ओम साई खांदेश्वर महिला-बाल मित्र मंडळाच्या गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी नगरसेविका सीताताई पाटील यांच्यासह मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.**

## संपादकीय


# सावधगिरीचा इशारा

शनिवारी मध्यरात्रीपासून रविवार सकाळपर्यंतच्या काळात मुंबईत घडलेल्या काही दुर्घटनांनी ऐन गणेशोत्सवात मुंबईतील उत्साहाला काहीसे गालबोट लागल्यासारखे झाले, मात्र या दुर्घटनांकडे केवळ अपघात म्हणून न पाहता, वेग, गर्दी आणि वैयक्तिक खबरदारी या तीन बाबींविषयी सगळ्याच नागरिकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

**गणेशोत्सवाचे उत्साहाने उधाणणारे पर्व राज्यभरात सर्वत्र सुखरूप पार पडावे अशी इच्छा आपण सारेच दरवर्षी बाळगून असतो. त्यामुळेच मुंबईसाठी रविवारचा दिवस काही वेदनादायी दुर्घटनांनी काळवंडल्यानंतर आपण काहिसे थबकलो. रविवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास मुंबईच्या सागरी किनारा मार्गावर म्हणजेच कोस्टल रोडवर झालेल्या भीषण अपघातात बीएमडब्ल्यू मोटारीतील तीन तरुणांचा मृत्यू झाला, तर एक तरुण गंभीर जखमी झाला. त्याच दिवशी पहाटे काळाचौकी परिसरात गणेशोत्सव मंडळाच्या प्रवेशद्वाराजवळ विजेचा धक्का लागून आठ वर्षांच्या मुलीसह दोन जणांचा मृत्यू झाला आणि चार जण जखमी झाले. या दोन्ही दुर्घटनांचे स्वरूप पूर्णपणे वेगळे असले तरी त्या सावधगिरीचा समान संदेश देऊन जातात. कोस्टल रोडवर पहाटे मरीन ड्राइव्हहून हाजी अलीच्या दिशेने जाणारी काळ्या रंगाची बीएमडब्ल्यू कार लोटस जेट्टीजवळील वळणावरून नियंत्रण सुटल्याने बाहेरील कठडा ओलांडून सुमारे ७५ फूट खोल खाली कोसळली. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार वाहनाचा वेग जास्त होता. गाडीत असलेल्या चार तरुणांपैकी तिघांचा मृत्यू झाला, तर चौथा तरुण गंभीर जखमी आहे. गुजरातमधून आलेले हे तरुण शिक्षणासाठी मुंबईत राहात होते. त्यांचा असा दुर्दैवी अंत होणे सगळ्यांनाच हळहळायला लावणारे आहे. अपघाताची नेमकी कारणे तपासली जात आहेत. कोस्टल रोडसारखा मोकळा मार्ग वाहनचालकांमध्ये वेग वाढवण्याचा मोह निर्माण करू शकतो. विशेषतः रात्री उशीरा ड्राइव्हिंगची मजा लुटण्यासाठी बाहेर पडलेले तरुण या मोहाला बळी पडतात, परंतु रस्ता कितीही चांगला असला तरी वेगावर नियंत्रण ठेवणेच योग्य असते. अन्यथा अवघ्या काही सेकंदांचा अतिरेक जीवघेणा ठरतो. नियमांचे पालन करून स्वतःच्या क्षमतेचे भान बाळगावेच लागते. तरुणांना नेमका याचा विसर पडतो. दुसरी दुर्घटना गणेशोत्सवाच्या गर्दीत घडली. काळाचौकीतील महागणपती उत्सव मंडळाच्या प्रवेशद्वाराजवळील तात्पुरत्या पाणी आणि शीतपेय विक्रीकेंद्राजवळ वीजप्रवाह पसरल्याने ही दुर्घटना घडली. यात आठ वर्षांच्या मुलीचा आणि ३३ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. तात्पुरती विद्युतजोडणी करताना पुरेशी खबरदारी न घेतल्याने शॉर्टसर्किटमुळे ही दुर्घटना घडली असावी असे समजते. गणेशोत्सव हा मुंबईच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लाखो नागरिक श्रद्धेने मंडपांना भेट देतात. त्यामुळे मंडप, तात्पुरत्या विद्युत जोडण्या, पाण्याची ठिकाणे आणि गर्दीची ठिकाणे याबाबत आयोजकांबरोबरच नागरिकांनीही अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे. ओले भाग, उघड्या तारा, तात्पुरत्या जोडण्या किंवा संशयास्पद विद्युत उपकरणे दिसल्यास त्यापासून दूर राहणे आणि त्वरित संबंधितांच्या निदर्शनास आणून देणे ही प्रत्येकाची जबाबदारी असते. सरकारी यंत्रणा अशा प्रसंगी तातडीने मदतकार्य करतात, परंतु कोणतीही यंत्रणा नागरिकांच्या व्यक्तिगत सावधगिरीची जागा घेऊ शकत नाही. वाहन चालवताना वेगाचे भान बाळगणे आणि गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी सुयोग्य सावधगिरी बाळगणे याबाबत नागरिकांनी स्वतः दक्ष राहणे आवश्यक दिसते. सुविधा कितीही आधुनिक असल्या तरी नागरिकांची सावधगिरीची जबाबदारी कायम असतेच, कारण सावधगिरी हीच सुरक्षिततेची पहिली पायरी असते.**

# लोकोत्तर व्यक्तिमत्त्व : कर्मवीर भाऊराव पाटील

विश्वविख्यात लेखक तसेच वक्ता शिव खेरा यांच्या पुस्तकातील ही कथा आहे. एका साधूला वाटेत एक हिरवागार मळा दिसला. वाऱ्यावर डोलणारं तरारलेलं पीक कौतुकाने बघत तो जवळ गेला. त्या शेतकऱ्याला तो म्हणाला, ''देवानं तुला या सुंदर शेताचे वरदान दिलं आहे याबल तू देवाचं ऋणी असलं पाहिजेस.'' त्या शेतकऱ्याने उत्तर दिलं, ''खरंय, देवाने मला हे सुंदर शेत दिलं आहे आणि त्याबल मी देवाचा ऋणी आहे, पण मी या शेतात काम करण्याच्या आधी फक्त देवाच्याच ताब्यात हे शेत होतं तेव्हा तुम्ही ते पहायला हवं होतं.''



१९२७ सालापासून कर्मवीर भाऊराव पाटील आणि सौ. लक्ष्मीबाई धनिणीच्या बागेत राहावयास आले. या जागेत प्रथम बैलांचा गोठा होता. गोठ्याची जागा व्यवस्थित करून घेतली. तिथेच राहाण्याची व्यवस्था झाली. २५ फेब्रुवारी १९२७ रोजी महात्मा गांधीजींनी अण्णांच्या वसतिगृहास भेट दिली. महात्मा गांधीजींनी या वसतिगृहाचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस', सातारा असे नामकरण केले.

प्रामाणिकपणा, धैर्य, चिकाटी आणि जबाबदाराची जाणीव यांसारख्या पायाभूत गुणांचा संस्कार असणारे, आयुष्यातलं आपलं ध्येय गाठणारे, सतत धडपड, धाडस करणारे, कठोर परिश्रम करणारे विद्यार्थी अण्णांच्या या वसतिगृहात होते. सौ. लक्ष्मीबाईंनी मुलांना बाजारहाट करणे, भाकरी भाजणे, भाजी करणे ही सर्व कामे शिकवली. दूध-दुभत्याची व्यवस्था करुन दिली. बागेत फुले, भाज्या पिकवून वसतिगृहाचे जीवन स्वावलंबी बनविले.

२० जून १९४०पासून 'महाराजा सयाजीराव फ्री अँड रेसिडेन्शिअल हायस्कूल' रीतसर सुरू झाले. सयाजीराव हायस्कूलची मुले बाजारहाट करणे, धान्य दळून आणणे, स्वयंपाक करणे, वाढणे, झाडलोट करणे, इत्यादी कामांप्रमाणे डोंगर फोडणे, ग्राऊंड लेव्हलिंग करणे, सपाट करणे, त्यावर गाळ पसरणे, वाफे करणे, केळीच्या बागा उठविणे इत्यादी कामेही करत.

सातारा येथे जून १९४७मध्ये छत्रपती शिवाजी महाविद्यालय सुरू केले. श्रमाच्या मोबदल्यात मोफत उच्चशिक्षण द्यायचे हा प्रयोग कर्मवीर अण्णांनी १९४७मध्ये सुरू केला. 'कमवा आणि शिका' ही नावीन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्ष कृतीत आणली. यशस्वी होण्यासाठी कर्मवीरांनी विद्यार्थ्यांना एक नवा मंत्र दिला. 'स्वावलंबनाने कष्ट करुन शिका'. 'कमवा आणि शिका'. या योजनेसाठी देवापूर येथे सरकारकडून १०० एकर जमीन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मिळविली. त्यावर गाळ टाकण्याकरिता एकरी १००० गाडी गाळ याप्रमाणे एक लाख गाडी गाळ टाकण्याची परवानगी पंढरपूर इरिगेशनकडून घेण्यात आली. अशा प्रकारे जमीन पिकाऊ करण्यात आली. सातारा येथील शिवाजी कॉलेजचे विद्यार्थी सुट्टीमध्ये देवापूर येथे राहून या शेतीमध्ये काम व अर्थार्जन करतात. या योजनेमधून उच्चविद्याविभूशित झालेले काही विद्यार्थी राजकारण, समाजकारण या क्षेत्रात यशोशिखरावर पोहोचले. याच योजनेमधून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासारखा एक मोठा आधारस्तंभ महाराष्ट्राला लाभला. 'रयत'च्या रायगड विभागातील अनेक शाळांबरोबरच पश्चिम व उत्तर महाराष्ट्रातील अनेक माध्यमिक शाळा, महाविद्यालयांना त्यांनी कोट्यवधी रुपयांची मदत केली आहे. ते म्हणतात, 'रयत शिक्षण संस्था माझे घर आहे. कर्मवीर अण्णांची भूमी आणि छत्रपती शिवाजी कॉलेज माझ्यासाठी पंढरी आहे.'

स्वावलंबन हा कर्मवीरांच्या समग्र कार्याचा पाया आहे. कर्मवीर भाऊराव पाटील म्हणायचे, ''विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांवर विद्यार्जनाचा आर्थिक भार न टाकता स्वावलंबनाने श्रम करुन अत्यंत काटकसरीने विद्या संपादन करावी. कोणत्याही प्रकारचा कमीपणा न मानता विद्यार्थ्यांनी श्रम करुन स्वावलंबी बनावे. श्रम केल्याशिवाय माणसाने अन्न खाऊ नये. स्वावलंबन हाच तरणोपाय होय. त्याग, प्रामाणिकपणा, समाज सेवा नि उद्योग यांचा विद्यार्थ्यांनी अवलंब केला पाहिजे.''

प्रचंड आत्मविश्वास, चिकाटी यामुळेच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण संस्थांचे प्रचंड जाळे जिल्ह्या-जिल्ह्यात तयार केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वावलंबी स्वायत्त शिक्षणाबल सुप्रसिध्द लेखक प्रभाकर वैद्य म्हणतात, ''श्रम आणि शिक्षण यांची सांगड घालणे, राष्ट्रभक्तीच्या बरोबरीनेच सामाजिक समतेचे संस्कारही, विद्यार्थ्यांवर लहानपणापासून घडविणे, विद्यार्थ्यांनीच आपल्या संस्था सहकार्याने व स्वायत्ततेने चालविणे, असे अनेक बहुमोल प्रयोग कर्मवीरांनी यशस्वी करुन दाखविले. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे यश इतके उज्ज्वल होते की खुद्द महात्मा गांधींनीसुध्दा याबद्दल मोकळ्या मनाने धन्योद्गार काढले. सामान्य जनतेचे सहकार्य, सामान्य जनतेने जमवलेली साधन-सामुग्री (पैसे, धान्य, कपडे, इमारतीचे सामान आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जनतेची श्रम-सेवा) हाच कर्मवीरांच्या कार्याचा मुख्य आधार होता.

कर्मवीर भाऊराव पाटील यांना म्युनिसिपल बुरो, धुळे, सातारा जिल्हा विद्यार्थी कॉंग्रेस निधी समिती, नगर जिल्हा लोकल बोर्ड, अहमदाबाद येथील विविध संस्था, लासलगाव, जि.नाशिक येथील संस्था, शिक्षण प्रसारक मंडळ-कान्हूर भाग, उत्तर सातारा जिल्हा लोकल बोर्ड यांच्याकडून मिळालेल्या सन्मान पत्रात कर्मवीरांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बालवयापासूनच सामाजिक सुधारणेचे, अस्पृष्यता निवारणाचे, साक्षरता प्रसाराचे पवित्र व जनहितकारक असे कार्य अत्यंत धडाडीने सुरु केले. सत्य, अहिंसा यांवर आधारलेल्या हिंदू-मुसलमान ऐक्य, अस्पृष्यता-निवारण, जातीयता नाश, शिक्षण प्रसार इत्यादी विधायक कार्यक्रमांना प्रत्यक्षात उतरविण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्त्रीशिक्षणाचे कार्य केले, बहुजन शिक्षणाचे कार्य केले. हरिजन शिक्षणाचे कार्य केले, सामाजिक सुधारणा केली, ग्रामोध्दार केला व हरिजनोध्दारही केला. महात्मा गांधीजींच्या कल्पना व्यवहारात आणल्या.

जातिभेद, धर्मभेद, वर्णभेद इत्यादी सर्व भेद नाहीसे करून समता, बंधुभाव व माणुसकी या गुणत्रयीने सर्व समाज एकत्रित झालेला पाहावा हे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे बालपणीचे सुखस्वप्न आज सातारा जिल्हयातील त्यांच्या अनेक शिक्षण संस्थात मूर्तस्वरुपात खरे ठरले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कर्तृत्व अगाध आहे. त्यांच्या ठायी औदार्य, त्याग आणि समता हे तपस्व्याचे गुण आणि अन्यायाचा प्रतिकार, दुश्टांचा नाश व दलितांचा कैवार हे सेनापतीच गुण एकवटले आहेत.

यश प्राप्त करण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. कामातील मूलभूत बारकावे परिश्रमपूर्वक आत्मसात करावे लागतात. यश नेहमी कृतीशील माणसांना मिळतं. मुलांना शेती शिकविण्यासाठी अण्णांनी आष्टयाचे मल्लीषा कनवाडे यांना सहकुटुंब धनिणीच्या बागेत आणून ठेवले होते. खानदेशातील ठिपक्यांच्या केळीची लागवड करण्यासाठी अण्णांनी खास रामू वडार नावाच्या मुलास खानदेशात केळीची लागवड कषी करायची ते शिकायला पाठविले होते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बोलण्यात, वागण्यात अतिषय नम्रता होती. आण्णा, माता-पित्याषी नेहमी आदराने व नम्रतेने बोलत व वागत. आण्णा, महर्षी शिंदे यांच्या भेटीस आले म्हणजे अतिशय अदबीने बोलत व अत्यंत आदर व्यक्त करीत. कसल्याही प्रकारचा अहंकार ते बाळगत नव्हते. पूर्वसूरींना वंदन करुन ते मान लववीत असत. नम्रता व्यक्तीला देव बनविते. प्रत्येक घरात देव समजून त्यांचे स्वागत होत असे. आण्णा सर्व मुलांबरोबर प्रेमाने, आपुलकीने बोलत असत.

कर्मवीर भाऊराव पाटील अत्यंत सरळमार्गी होते. ते सेवाभावी वृत्तीचे होते. मानवता ही एकच जात व माणुसकी हाच धर्म मानत असत. ती आण्णांना वाचनाची अतिषय आवड होती. त्यांचे वाचन विस्तृत होते. वर्तमानपत्रे व समकालीन अनेक पुस्तके ही ते वाचत असत. ते नेहमी म्हणत, चांगल्या कार्याला मदत करावी, मदत करतांना सर्वात पुढे असावे, उदार वृत्ती सदा असावी.

कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात, 'मायाबरोबर जे शिक्षक काम करीत आहेत ते शिक्षणाच्या क्षेत्रात मनापासून रमलेले आहेत. मी आतापर्यंत जे काही कार्य करु शकलो, त्यात आमच्या शिक्षकांचा वाटा फार मोठा आहे. आमच्या शिक्षकांनी दरमहा ६ रुपये घेऊन अत्यंत साधेपणाने राहून व गावकऱ्यांकडे जेवून कामे केली आहेत.'

जगप्रसिध्द वक्ता तसेच लेखक रॉबीन षर्मा म्हणतात, ''चांगल्याच आचारविचारांनी व्यवहार करा आणि जातांना मागे उत्तमच ठेवून जा. मग बघा साक्षात काळालाही तुमची मुद्रा पुसता येणार नाही.'' ते म्हणतात, ''मी या जगात आलो ते रिकाम्या हातांनी, पण मी या जगात नसेन तेव्हा माझा विवेक, माझे कार्य, इथे सोडून जाईन.''

आज कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती, त्यांना आमचे अभिवादन!

**-डॉ.विजयकुमार रणदिवे,** पनवेल




## 'क्लॉड'ने केले थेट चॅटजीपीटीलाच हॅक!

कृत्रिम बुद्धिमत्ता जगताला हादरवणारी एक धक्कादायक घटना समोर आली असून अवघ्या काही तासांच्या आत तीन संशोधकांनी OpenAIचे सुरक्षित मानले जाणारे 'चॅटजीपीटी' यशस्वीरीत्या हॅक केले आहे. संशोधकांनी चॅटजीपीटीची सुरक्षा भेदण्यासाठी कोणत्याही पारंपारिक पद्धतीचा वापर न करता त्यांचीच प्रतिस्पर्धी कंपनी असलेल्या अँथ्रोपिकच्या 'क्लॉड' या एआय मॉडेलचा वापर केला.





टेक जगतात सध्या दोन आघाडीच्या प्रतिस्पर्धी कंपन्यांमधील थेट संघर्ष चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून यामध्ये जगाला चॅटजीपीटीची ओळख करून देणारी 'ओपनएआय' आणि शक्तिशाली 'क्लॉड' मॉडेलची निर्मिती करणारी 'अँथ्रोपिक' या दोन्ही दिग्गज कंपन्या आमनेसामने आल्या आहेत. एका एआय मॉडेलचा वापर करून दुसऱ्याची सुरक्षा भेदल्याचे हे प्रकरण समोर आल्याने सायबर आणि टेक इंडस्ट्रीत खळबळ उडाली आहे.

सायबर संशोधकांनी OpenAIची मुख्य प्रतिस्पर्धी असलेल्या अँथ्रोपिकच्या सॉफ्टवेअरच्या साहाय्याने चॅटजीपीटीची सुरक्षा भेदली असून, या घटनेमुळे कंपनीच्या सायबर सुरक्षा रचनेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'द वॉल स्ट्रीट जर्नल'ने दिलेल्या वृत्तानुसार संशोधकांच्या एका छोट्या गटाने OpenAIच्या एका कर्मचाऱ्याचे अंतर्गत चॅटजीपीटी खाते हॅक केले. या घुसखोरीनंतर संशोधकांना त्या कर्मचाऱ्याच्या खात्यावरील अंतर्गत संदेश आणि गोपनीय डेटा सहज वाचता येत होता. चॅटजीपीटीच्या निर्मात्यांच्याच घरात प्रतिस्पर्धी एआयच्या मदतीने सुरक्षा यंत्रणेला सुरुंग लावण्यात आल्याचे उघड झाले.

दरम्यान, सायबर संशोधकांच्या पथकाने ही घुसखोरी कोणत्याही गैरहेतूने नव्हे, तर एका विशेष सायबर सुरक्षा कार्यक्रमांतर्गत केली होती. प्रणालीमधील संभाव्य त्रुटी आणि सुरक्षेतील पळवाटा वेळीच शोधून काढून त्या तत्काळ दुरुस्त करणे हाच या विशेष मोहिमेचा मुख्य उद्देश होता. भविष्यात कोणत्याही हॅकर्सकडून अशा त्रुटींचा गैरवापर होऊ नये म्हणून या संशोधकांनी आधीच ही सुरक्षिततेची चाचणी घेऊन चॅटजीपीटीच्या यंत्रणेला सावध केले.

ओपनएआयने आपल्या बग बाऊंटी प्रोग्रामअंतर्गत सायबरसुरक्षा कंपनी हॅक्ट्रॉन एआयच्या तीन संशोधकांना ६,५०० डॉलर्स दिले आहेत. तंत्रज्ञान कंपन्या त्यांच्या सुरक्षेची चाचणी घेण्यासाठी आणि त्रुटी शोधण्यासाठी एथिकल हॅकर्सना पैसे देतात.

# शिख धर्माचे संस्थापक गुरू नानक



निमित्त


शिख धर्माचे संस्थापक आणि शिखांचे पहिले गुरू नानक यांचा आज स्मृतीदिन. त्यांचा जन्म लाहोरजवळील रावी नदीच्या काठी वसलेल्या तलवंडी नावाच्या गावात झाला. काही विद्वान त्यांची जन्मतारीख १५ एप्रिल १४६९ मानतात, पण प्रचलित तारीख कार्तिक पौर्णिमा आहे, ती दिवाळीनंतर १५ दिवसांनी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये येते. या गावाला आता ननकाना साहिब असे म्हटले जाते.

गुरू नानक यांच्या वडिलांचे नाव मेहता काळू जी, आईचे नाव तृप्त देवी होते. लहानपणापासूनच गुरू नानक यांनी धारदार बुद्धिमत्तेची चिन्हे दाखवायला सुरुवात केली. ते लहानपणापासूनच सांसारिक विषयांकडे दुर्लक्ष करायचे. त्यांनी आपला सर्व वेळ आध्यात्मिक चिंतन व सत्संगात व्यतीत केला. बालपणात अनेक चमत्कारिक घटना घडल्या, ज्यामुळे खेड्यातील लोकांनी त्यांना दैवी व्यक्तिमत्त्व म्हणून पहायला सुरुवात केली. लहानपणापासूनच त्यांचे आदरणीय असणाऱ्यांमध्ये त्याची बहीण नानकी आणि गावचे शासक राय बुल्यर हे प्रमुख होते. गुरू नानक यांचे लग्न वयाच्या सोळाव्या वर्षी गुरदासपूर जिल्ह्यातील लक्की नावाच्या रहिवासी असलेल्या मूळच्या कन्या सुलखानी यांच्याशी झाले. वयाच्या ३२व्या वर्षी त्यांचा पहिला मुलगा श्रीचंद याचा जन्म झाला. चार वर्षांनंतर दुसरा मुलगा लखमीदास याचा जन्म झाला. दोन्ही मुलांच्या जन्मानंतर १५०७मध्ये गुरू नानक यांनी मर्दाना, लहना, बाला आणि रामदास हे चार सहकाऱ्यांसह यात्रेसाठी निघून गेले.

गुरू नानक लहानपणापासूनच धार्मिक होते. ज्ञानप्राप्तीनंतर शीख धर्माच्या तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी देशभर यात्रा केली. जगभरातील धार्मिक स्थळांनाही त्यांनी भेटी दिल्या. सर्वसामान्यांमध्ये देव, धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी शीख धर्माची शिकवण दिली. त्यांनी आयुष्यभर हिंदू व मुस्लिम धर्मियांना एकतेचा संदेश दिला. त्यांनी त्या काळात केवळ भारतभ्रमणच नव्हे; तर इराकमधील बगदाद आणि सौदी अरेबियात मक्का-मदिनेचीही यात्रा केली होती. अनेक अरब देश त्यांनी पालथे घातले.

गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य व शाश्वत मुल्यांचे मूळ होते. म्हणूनच जात-धर्म या पलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे अशी त्यांची इच्छा होती. एकदा बेई नदीतून स्नान केल्यानंतर बाहेर आल्यावर त्यांनी 'कुणीही हिंदू नाही आणि कुणीही मुसलमान नाही, सर्व जण मानव आहोत', असा नारा दिला होता. हे जग बनविणारा एकच ईश्वर आहे, असे त्यांचे म्हणणे होते. धर्म हे दर्शन आहे, दिखावा नाही, अशी त्यांची धारणा होती. त्यासाठी अनेक केंद्राची साखळी निर्माण केली. त्यांनी एकता, श्रद्धा व प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारी विचारांचे होते. त्यांनी नवीन विचारधारेचा प्रचार केला. (साभार : संतसाहित्य)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### मिठाच्या गुळण्या करा, संसर्गजन्य आजार टाळा!

कोणताही महिना असो सर्दी, खोकला, ताप असे त्रास कायम होतात. सगळ्यात जास्त त्रास होतो तो घशाला. काही खायचे म्हटले तरी त्रास होतात तसेच या त्रासांचे जंतुही शरीरात घशावाटेच जातात. त्यामुळे घशाची काळजी घेणे फार गरजेचे असते. त्यासाठी फार काही औषधे वगैरे घ्यायची गरज नाही. आठवड्यातून दोनदा फक्त गरम पाण्याने गुळण्या करा. घशाला आराम मिळतो आणि जंतुही मरतात. शिवाय अगदी पटकन करता येणारा उपाय आहे. फार कष्ट घ्यावे लागत नाहीत तसेच अगदी पाच मिनिटांत गुळण्या करून होतात.



गरम पाण्याने आठवड्यातून किमान दोनदा गुळण्या करणे ही अतिशय सोपी पण प्रभावी सवय आहे. कोमट पाणी घशातील व तोंडातील जंतू नष्ट करून स्वच्छता राखते आणि संसर्ग होण्याचा धोका कमी करते. रोजच्या धावपळीत तोंडाची योग्य काळजी घेतली जात नाही, त्यामुळे दातांवर जंतू वाढतात. हिरड्यांना सूज येते, घसा वारंवार खवखवतो किंवा सर्दी-खोकला होतो. अशा वेळी गरम पाण्याच्या गुळण्यांचा उपयोग होतो. कोमट पाण्यामुळे घशातील वेदना कमी होतात. तोंडातील दुर्गंधी नाहीशी होते आणि हिरड्यांना बळकटी मिळते.

गुळण्या केल्यावर रक्ताभिसरण सुधारते आणि तोंडातील सूक्ष्म जखमा लवकर भरून येतात. गुळण्यांच्या पाण्यात वेगवेगळे नैसर्गिक पदार्थ घातल्यास त्याचे फायदे अधिक वाढतात. जसे की मीठ घालून गुळण्या करणे घशासाठी फारच फायद्याचे ठरते. घशातील सूज, खवखव व वेदना कमी होतात आणि जीवाणू नष्ट होतात. हळद घालून गुळण्या केल्यास तिच्या जंतुनाशक आणि दाहनाशक गुणधर्मांमुळे तोंडातील तसेच घशातील संक्रमण आटोक्यात राहते.

तोंडातील दुर्गंधी नाहीशी करण्यासाठीही गुळण्या फायद्याच्या आहेत. हिरड्यांची सुजही गुळण्या केल्याने कमी होते. तुरटीच्या पाण्याने गुळण्या केल्याने कानाचे दुखणे, घशाचे दुखणेही कमी होते. तुरटीमुळे अनेक फायदे मिळतात. आवाजही मोकळा होतो.

मीठाच्या पाण्याने गुळण्या करणे फक्त घशासाठीच नाही तर पित्ताचा त्रास होणाऱ्यासाठीही फायद्याचे आहे. मीठामुळे स्वच्छता होते आणि अपचन होण्याची शक्यता जरा कमी होते. घशात अडकलेले अन्न बाहेर पडून जाते. त्यामुळे मीठाच्या पाण्याने गुळण्या करणेही फायद्याचेच आहे.

# रोहा रेल्वेस्थानक होणार हायटेक!

## केंद्राकडून ५५ कोटींच्या निधीला मंजुरी ▌खासदार सुनील तटकरे यांची माहिती

**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

कोकणी माणसाचा सर्वात आवडता गणेशोत्सव सर्वत्र उत्साहात साजरा होत असताना रोहे करांना गणपती बाप्पा पावला असल्याचे येत्या काळात रोहा रेल्वे स्थानक आता हायटेक होणार असल्याची सुखद वार्ता खासदार सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषद घेत नागरिकांना दिली.

रोहा रेल्वे स्थानकाचे अत्याधुनिक सुशोभीकरण व्हावे यासाठी ते संसदेत गेल्यापासून प्रयत्नशील होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश येत केंद्राकडून या कामासाठी ५५ लाखांचा निधी मंजूर झाला आहे यामधून रोहा रेल्वे स्थानकाचा कसा कायापालट होत प्रवासी वर्गाला मिळणाऱ्या सुविधाची माहिती ध्वनीचित्र फितीद्वारे दाखवत पत्रकार परिषदे मध्ये दिली.भारतीय रेल्वे बोर्डाचे चेअरमन यांनी या निधी मान्यतेला दिलेल्या मंजुरी व त्यादृष्टीने पुढे करायच्या कार्यवाही चे पत्र पत्रकार परिषदे मध्ये जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांचेकडे नागरिकांचे माहितीसाठी सुपूर्द केले.

डॉ. सी. डी. देशमुख शहर सभागृह येथे रविवारी सायंकाळी घेतलेल्या या पत्रकार परिषद प्रसंगी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, जिल्हा कार्याध्यक्ष ॲड मनोजकुमार शिंदे,मुख्याधिकारी अजयकुमार एडके, जिल्हा उपाध्यक्ष समीर सकपाळ, तालुका अध्यक्ष महेंद्र पोटफोड,तालुका कार्याध्यक्ष समीर शेडगे, अनंतराव देशमुख, ॲड प्रशांत देशमुख, मकरंद बारटक्के,सभापती महेंद्र दिवेकर, रविंद्र चाळके, महेश कोलटकर, गटनेते महेंद्र गुजर, रामचंद्र सकपाळ, नगरसेवक अजित मोरे, दिवेश जैन, अरबाज मनेर,कादिर रोगे, स्वप्नील धनावडे, प्रेषित बारटक्के,पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



संसदेच्या प्रत्येक अधिवेशनात रायगड सह रोह्यातील विकासाला चालना मिळण्यासाठी खा. तटकरे सतत प्रयत्नशील आहेत. त्याच धर्तीवर रोहा रेल्वे स्थानक हे मध्य व कोकण रेल्वे यांना जोडणारे महत्वाचे स्थानक, महाराष्ट्र कंठमणी म्हणून ओळख असलेले डॉ. सी डी देशमुख, प पु. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे गाव असल्यामुळे या रेल्वे स्थानकाचे अत्याधुनिक पद्धतीने सुशोभीकरण होत प्रवासी सुविधा उपलब्ध कराव्यात अशी मागणी त्यांनी अधिवेशनात व प्रत्यक्ष रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे कडे पत्राद्वारे केली होती. यासोबत याचा पाठपुरावा रेल्वे बोर्डाचे चेअरमन, मुंबई विभाग व्यवस्थापक यांचे कडे सतत करत होते त्याला यश येत रोहा रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासाला आता गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मध्य रेल्वेच्या मुख्यालयातील अभियांत्रिकी विभागाने रोहा स्थानकावरील विविध विकासकामांसाठी प्रशासकीय मान्यता देत तीन महत्त्वाची कामे शॉर्टलिस्ट केली आहेत. या कामांची एकूण अंदाजित किंमत ५४.८१ कोटी रुपये असून, संबंधित कामांना लवकरात लवकर मंजुरी देऊन निविदा प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.मध्य रेल्वेच्या मुख्य अभियंता (नियोजन) विनोद भांगले यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, रोहा स्थानकाच्या विकासासाठी तीन कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

यामध्ये १९.२७ कोटी रुपये खर्चून सर्क्युलेटिंग एरियाचा विकास, जोडरस्त्यांची निर्मिती तसेच विद्यमान बुकिंग कार्यालयाचे स्थलांतर करण्यात येणार आहे. तसेच १९.४४ कोटी रुपये खर्चून स्थानक इमारत व प्लॅटफॉर्म परिसराचे पुनर्विकासासह अग्निशमन यंत्रणेची सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.तिसऱ्या कामामध्ये १६.१० कोटी रुपये खर्चून स्थानकासाठी प्रवेशद्वार उभारणे, मुख्य प्रवेशरस्त्याचे रुंदीकरण व विकास तसेच परिसराचे लॅण्डस्केपिंग करण्यात येणार आहे.

### आधीच मंजूर कामालाही गती देण्याचे निर्देश

या तीन प्रस्तावित कामांबरोबरच 'रोहा रोड स्थानक इमारत, सर्व्हिस बिल्डिंग, फॅसाड, सर्क्युलेटिंग एरिया, कव्हर ओव्हर प्लॅटफॉर्म (COP) आदींसह रोहा स्थानकाचे उन्नतीकरण' या कामासाठी २०२५–२६ मध्ये १९.८७ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. या कामावर आतापर्यंत ७.०२ कोटी रुपये खर्च झाले असून, सध्याच्या अपेक्षित खर्चानुसार आणखी १२.८४ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या कामाची निर्धारित पूर्णत्वाची तारीख ३१ मार्च २०२८ आहे.दरम्यान, शॉर्टलिस्ट केलेल्या तीनही कामांना आवश्यक मंजुरी देण्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून GAD मंजुरी, निविदा प्रक्रियेचे नियोजन आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याची विनंती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करण्यात आली असल्याची माहिती खा सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यासोबत अष्टमी येथील उड्डाणंपुलाचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून काही तांत्रिक अडचणी मुळे रखडलेले पडम येथील कामही लवकरच सुरु होईल. यासह पिंगलसई विभाग अंडर पास, याच विभागातील नागरिकांना रेल्वे स्थानकात प्रवेश करण्यासाठी पादचारी पूल उभारणे यांसबधी लवकरच रेल्वे च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेत चर्चा करणार असल्याचे खा. सुनिल तटकरे यांनी यावेळी आवर्जून सांगितले आहे. एकूणच खा. सुनिल तटकरे यांचे विकासात्मक दृष्टीने रोहा रेल्वे स्थानक हायटेक होत अधिकाधिक नागरिकांना रेल्वे रेल्वे सेवा सुलभ होईल असे दिसत आहे.

## लव्हेज गावाने जपली ढोल ताशाची वाद्याची परंपरा

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लव्हेज गावाने शेकडो वर्षाची ढोल ताशाची वाद्याची परंपरा जपली. गणपती मिरवणुकीत डीजे ऐवजी भजनी मंडळ, महिलांची पारंपरिक फुगडी व ढोल ताशाचा गजर यामुळे विसर्जन मिरवणूक सोहळा अत्यंत थाटामाटा संपन्न झाला

या गावातील ग्रामस्थ एकोप्याने सण साजरा करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. विसर्जन मिरवणुकीत ढोल ताशाचा गजर, भजनी मंडळाचे गोड स्वर, व महिला मंडळाचा फुगडीचा ठेका या पद्धतीने मिरवणूक आगळयावेगळया पद्धतीने नेण्याची परंपरा जपत आहे.




### शुध्दीपत्रक क्र. १
**( ई–निविदा सुचना क्र. २० सन २०२६–२७)**

**संदर्भ :– या कार्यालयाचे पत्र जा.क्र. पवि/लेशा/निविदा/३७१५, दि. ०९.०९.२०२६**

| प्रसिध्द झालेले | सुधारीत वाचावे |
| --- | --- |
| १. ऑनलाईन निविदा विक्रीचा कालावधी दिनांक १५/०९/२०२५ ते २२/०९/२०२६ (१८.००) वाजेपर्यंत | ऑनलाईन निविदा विक्रीचा कालावधी दिनांक २२/०९/२०२६ ते २९/०९/२०२६ (१८.००) वाजेपर्यंत |
| २. निविदा उघडण्याचा दिनांक २४/०९/२०२६ रोजी १५.०० वा. (शक्य झाल्यास) | निविदा उघडण्याचा दिनांक ०१/१०/२०२६ रोजी १५.०० वा. (शक्य झाल्यास) |

(सदर निविदेसूचनेमध्ये अथवा निविदेत काही बदल होत असल्यास खालील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)
१. http://mahatenders.gov.in

जा.क्र. साबांवि/पनवेल/ई–निविदा/२०२६/. कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल
दिनांक :– २१/०९/२०२६

**सही/–**
**उपकार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल

आरओसी–२०२६–२७/क्र.–५/सी–२९३४


# वडगाव येथील कुस्ती स्पर्धेत हनुमान तालीम संघ नावडे विजेता

## हरियाणाच्या रणजीत खत्रीने मानाची गदा पटकावली

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे हनुमान तालीम संघ व ग्रामस्थ मंडळ वाडगाव यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या खासदार केसरी कुस्ती स्पर्धेत हनुमान तालीम संघ नावडे, पनवेल यांनी विजेतेपद मिळवले. हरियाणाचा रणजीत खत्री याने प्रथम क्रमांकाची कुस्ती जिंकून मनाची गदा पटकावली. महिलांमधील अंतिम लढत बरोबरीत सुटली.

वाडगाव येथे रविवारी (दि. २०) ही कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेकरिता राज्यभरातून १६ आखाड्यांनी सहभाग नोंदविला. या आखाड्यातील महिला व पुरुष पैलवानांच्या कुस्त्या रंगल्या. स्पर्धेत पैलवानांनी स्वतः जोडलेल्या पुरुष पैलवानांच्या १२० कुस्त्या तसेच मंडळाने जोडलेल्या ६० कुस्त्या त्याचप्रमाणे महिला पैलवानांच्या २० कुस्त्या झाल्या.

स्पर्धेत यजमान हनुमान तालीम संघ वाडगाव यांनी सर्वाधिक कुस्ती जिंकून प्रथम क्रमांक प्राप्त केला, परंतु वाडगाव संघ आयोजक असल्याने प्रथम क्रमांक हा त्यानंतरचे जास्त गुण असलेल्या दुसऱ्या संघाला देण्यात आला. त्यामुळे या स्पर्धेतील प्रथम क्रमांक हनुमान तालीम संघ नावडे पनवेल यांनी मिळवला. द्वितीय क्रमांक शिरगाव पुणे आखाडा व तृतीय क्रमांक काळभैरव आवास यांनी पटकावला.



स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या कुस्तील विजेत्यासाठी एक लाख रुपये, द्वितीय ७५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकाची कुस्ती जिंकण्यासाठी ५० हजार रुपये अशी बक्षिसे देण्यात आली. महिलांच्या प्रथम क्रमांकाच्या कुस्ती विजेतीसाठी १० हजार रुपये, द्वितीय आठ हजार, तिसऱ्या क्रमांकाच्या कुस्ती विजेतीसाठी सहा हजार रुपये अशी बक्षिसे देण्यात आली.

स्पर्धेतील उद्घाटनीय कुस्ती शिरगाव तालीम संघाचा महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान साहिल सकपाळ आणि पुण्याचा पैलवान पवन डुबल यांच्यात झाली. तब्बल साठ मिनिटे रंगलेली ही कुस्ती पैलवान सकपाळ याने जिंकली. पुरुष गटामध्ये प्रथम क्रमांकाची कुस्ती पुणे येथील दादा तालीमचा राष्ट्रीय पदक विजेता उपमहाराष्ट्र केसरी पैलवान सुदर्शन कोतकर आणि बहादूर आखाडा हरियाणाचा पैलवान मंजीत खत्री यांच्यात झाली. अटीतटीच्या झालेल्या या कुस्तीमध्ये पैलवान रणजीत खत्री याने सुदर्शन कोतकर याच्यावर विजय मिळवत मानाची गदा पटकावली. महिला पैलवानांमध्ये अंतिम लढत पैलवान लोणावळा येथील राष्ट्रीय पदक विजेती सनम शेख व शिरगाव पुणे येथील राष्ट्रीय पदक विजेती पैलवान श्रावणी सातकर यांच्यात झाली. ही कुस्ती बरोबरीत सुटली.

कुस्ती स्पर्धा यशस्वी होण्यासाठी हनुमान तालीम संघ वडगावच्या सर्व पदाधिकारी, सदस्य व सर्व खेळाडूंनी परिश्रम घेतले.

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त रोह्यात वृक्षवाटप



**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. भाजपा धाटाव विभागाध्यक्ष सचिन मोरे यांच्या माध्यमातून तालुक्यातील विविध भागांतील शेतकऱ्यांना सुपारी व आंब्याची रोपे रविवारी दि. (२०) रोजी शासकीय विश्रामगृहात कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांच्या शुभहस्ते शेतकऱ्यांना रोपांचे वाटप करण्यात आले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अमित घाग, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, नगरसेवक रोशन चाफेकर, सरचिटणीस कृष्णा बामणे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रिया कासार, शहराध्यक्ष मृणाल पेंडसे, परेश चितलकर, शैलेश रावकर, ज्ञानेश्वर जाधव, दीपक मोरे, निलेश जंगम, संदेश जंगम, हाजी कोठारी, वैभव कुलकर्णी, धनश्री बापट, जयश्री भांड, महेश मोहिते, दीपक कोल्हटकर, सोशल मीडिया प्रमुख सनिल इंगावले, राज कासार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



**रोहा : भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या जानकी निवास याठिकाणी जिल्हा परिषद सदस्य शिवसेना विघ्नेश माळी, तालुकाप्रमुख उद्देश वाडकर, संपर्कप्रमुख संदेश मोरे, युवा नेते सुदर्शन गावडे, माजी सरपंच विकास पाटील, गणेश खरीवले, माजी ग्रामपंचायत सदस्य वैभवी भगत, विभाग अध्यक्ष सचिन मोरे, राजेश भगत, श्रद्धा घाग, गुणाजी घाग, अमोल सानप यांनी बाप्पाचे दर्शन घेतले.**


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांची विद्यमान मालक परशुराम काळ्या कोळी, मंजुलाबाई कृष्णा कोळी, विठ्ठल काळ्या कोळी गंगुबाई रामदास पाटील यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल शुभलक्ष्मी कुशाली नागेशकर यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक परशुराम काळ्या कोळी, मंजुलाबाई कृष्णा कोळी, विठ्ठल काळ्या कोळी, गंगुबाई रामदास पाटील यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे सांगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे .

**मिळकतीचे वर्णन : मौजे टाकीगाव ( ५५३३२५)**
ULPIN : **२३७४२४३५२२०, ता. उरण जि. रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
| --- | --- | --- | --- |
| ५ /१ खाते क्रमांक – ९९ | १ | ०.६८.५० पो.ख ०.१०.०० **एकूण क्षेत्र ०.७८.५०** | ८.६२ |

वरील एकूण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.४३.५० गुंठे हे विक्रीस असलेल्या क्षेत्राची पेपर नोटिस

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार मिळकत, विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क वारसा वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ७ **(सदर नोटिस वर्ग २ असताना २१ दिवसांची दिली होती पण आता वर्ग १ झाल्यानंतर ७ दिवसांची अशीलांच्या संगण्यानुसार देत आहे)** दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क – हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून ७ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१ सप्टेंबर २०२६

**सही**
**ॲड. निलेश झंजाड**

बी १०४ सफायर सी.एच.एस.लि., सेक्टर २२, भूखंड क्रमांक ३३/३४, कामोठे – ता. पनवेल, जि. रायगड.
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मिळकती जमीन मालकांकडून सदर मिळकती कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतींचे वर्णन :**
**मौजे – वारदोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे. आर.पॉ.) | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
| --- | --- | --- | --- | --- |
| ९१ | १/ब/१ | ०–२०–५० पो.ख. ०–०३–०० **एकूण ०–२३–५०** | ०.३२ | शुभांगी सुनिल टाकळे |
| ८७ | २ | ०–६६–०० पो.ख. ०–०७–८० **एकूण ०–७३–८०** | ७.२५ | शुभांगी सुनिल टाकळे<br>संदिप सुनिल टाकळे<br>सनी सुनिल टाकळे<br>स्विटी सुनिल टाकळे |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक : २१/०९/२०२६

खरेदीदाराचे वकील
**सही/–**
**ॲड. एस. के. राणे**

पत्ताः– शॉप नं. १२३, मुन्सीपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहीला मजला,भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६, मो. ९८१९८६९२१२



### सावधान नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर उरण यांचेकडील नियमित दिवाणी दावा क्रमांक १५८/२०२४ च्या कामी.**

या जाहीर नोटीसव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. प्रियंका जगदीश पाटील, सौ. सोनाली आकाश मढवी, श्रीमती रेश्मा गजानन केणी आणि सौ. बेबी गजानन केणी यांनी त्यांच्या वडीलोपार्जित मिळकतींसह खालील मिळकतींबाबत देखिल दिनांक १८/१२/२०२४ रोजी दावा दाखल केलेला आहे.

**शेत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबुसरे, ता. उरण, जि. रायगड**

| गाव | भूमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू/पैसे |
| --- | --- | --- | --- | --- |
| कळंबुसरे, ता. उरण. | ६३ | १/अ | ०–४०–० गुंठे | १.१४ |

वरील मिळकतींमध्ये माझे अशिलांचा हिस्सा व कायदेशीर असा हक्क हितसंबंध असताना केवळ प्रतिवादी क्र. १ श्री. गजानन धनाजी केणी यांचकडील दस्तानुसार प्रतिवादी क्र. २ श्री. प्रभाकर महादेव झेंडे यांनी शेतमिळकत माझे अशिलांचा हक्क व हितसंबंधानाशिवाय तबदील केला आहे.

दिनांक २७/०८/२०२६ रोजी वरील शेतजमीनीबाबत प्रतिवादी क्र. २ यांनी कुलमुखत्यारपत्राच्या आधारे वरील मिळकतींबाबत मा. दुय्यम निबंधक उरण यांच्याकडील दस्तकमांक उरन ६४७५ / २०२६ आणि उरण ६४७६/२०२६ नुसार सुमारे २५ इसमांना मा. न्यायालयांत दावा प्रलंबित असताना विक्री केला आहे. माझे अशिलांचा वरील मिळकतींमधील हिन्दू वारसा कायदयानुसार असलेला हिस्सा व अधिकार विकण्याचा आणि विकत घेण्याचा संबंधीत प्रतिवादी क्र. २ आणि २५ इसमांना कोणताही अधिकार नव्हता व नाही.

तरी वरील शेतमिळकतींबाबत कोणीही गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, असे कोणतेही कार्य करूनये अशी विनंती माझे अशिल हया नोटीसव्दारे तमाम जनतेस करत आहेत.

ठिकण : धुतूम–उरण
ता. २१/०९/२०२६

**सही/–**
**ॲड. किशोर धनाजी ठाकुर**

**कार्यालय :** ऑफीस क्र. २, जय भवानी संकुल, जय भवानी पेट्रॉल पंपजवळ, जे.एन.पी.टी., कळंबोली रोड, पौंडखार गाव, पो. जासई (व्हाया पनवेल – ४१०२०६) ता. उरण, जि. रायगड.

# गणेशोत्सवात डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा निर्माल्यापासून खतनिर्मितीचा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील व आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी नागरिकांना केलेल्या गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्याच्या केलेल्या आवाहनास अनुसरून नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभत असून शाडूच्या मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यासोबतच विसर्जनस्थळी श्रीमूर्तींसोबत येणारे निर्माल्यही स्वतंत्र निर्माल्य कलशात ठेवले जात आहे. या संकलित निर्माल्याची तुर्भे येथील प्रकल्पस्थळी त्याचे पावित्र्य जपून पर्यावरणपूरक स्वतंत्र विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

याशिवाय गतवर्षीप्रमाणेच डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांच्या नवी मुंबईतील श्री सदस्यांमार्फत ६ विसर्जनठिकाणी निर्माल्याचे वर्गीकरण करून संकलित करण्याची व्यवस्था दीड दिवसांच्या गणेश विसर्जन दिवसापासूनच करण्यात आलेली आहे.

या अंतर्गत प्रतिष्ठानच्यावतीने दिवाळी जेट्टी, बेलापूर गाव तलाव, नेरूळ गाव तलाव, चिंचोली तलाव शिरवणे जुईनगर, कोपरखैरणे धारण तलाव सेक्टर १९, ऐरोली खाडी तलाव आणि रबाळे तलाव अशा ६ विसर्जन



स्थळांच्या ठिकाणी निर्माल्याचे ओले व सुके असे वर्गीकरण करून संकलन करण्यात येत आहे. यामधील ओल्या निर्माल्यापासून पाकळ्या विलग करून खतनिर्मिती करण्यात येत आहे. हे कोपरखैरणे धारण तलावाजवळील उद्यान व ऐरोली खाडी तलावाजवळील उद्यानामध्ये बनविण्यात आलेल्या कंपोस्ट पीटमध्ये जमा करून निर्माल्यापासून तयार होणारे खत वृक्षराजी फुलविण्यासाठी वापरले जाणार आहे.

डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांच्या वतीने महाराष्ट्रभूषण पद्मश्री डॉ.श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ श्री सचिन दादा धर्माधिकारी यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनातून श्रीसदस्यांमार्फत साकारण्यात येणारा हा अभिनव उपक्रम पर्यावरणाची जपणूक करणारा आहेच शिवाय स्वच्छ भारत अभियानालाही नवा आयाम देणारा आहे.

१.५ दिवसाच्या श्रीमूर्ती विसर्जनप्रसंगी दिवाळे येथील विसर्जनस्थळी ११० किलो, बेलापूर येथे १७५ किलो, नेरूळ येथे २३० किलो, शिरवणे येथे २०० किलो, कोपरखैरणे येथे ३२० किलो व ऐरोली येथे ४५० किलो अशाप्रकारे एकूण १४८५ किलो निर्माल्य संकलित करण्यात आले आहे व त्यापासून प्रतिष्ठानच्या माध्यमातून खतनिर्मिती करण्यात येणार आहे. हा उपक्रम गणेशोत्सवातील सर्वच विसर्जनांच्या दिवशी या ६ ठिकाणी राबविला जाणार आहे.

या पर्यावरणशील अभिनव उपक्रमाबद्दल महापौर सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांच्या सर्व श्रीसदस्यांची प्रशंसा केली आहे.

## सोनखारच्या राजासमोर अवतरली संतसृष्टी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत अनेक जुन्या मडळांमार्फत गणेशोत्सव सामाजिक प्रबोधनात्मक देखाव्यांच्या सादरीकरणातून साजरा केला जातो. यापैकीच सानपाडा येथील मूळ सोनखारच्या भूमीत नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नाखवा सीताराम भगत सांस्कृतिक उत्सव मंडळ आयोजित सोनखारचा राजा विराजमान असून, मंडळाचे यंदाचे ३० वे वर्ष असून यावर्षी श्रीगणराया समोर मंडपात समाजिक प्रबोधन म्हणून संतसृष्टीचा देखावा उभारण्यात आलेला आहे. मंडळाच्या उत्सवाच्या संचालनाची सर्व जबाबदारी जेष्ठ नागरिक घेतात हे विशेष. सानपाडा – सोनखार (पामबीच) विभागातील सेक्टर्स मधील सर्वच सोसायट्याचा सहभाग व साथ प्रतीवर्षी लाभत असते.

देशातील व महाराष्ट्रातील संतांनी त्यांच्या काळात भक्तीची जोड देऊन समाजासाठी दिलेल्या योगदान व शिकवणीची माहिती चलचित्र व देखाव्याच्या स्वरूपात दर्शनास भक्तांसमोर मांडण्यात आली आहे, जी पाहण्यासाठी सानपाड्यासह नवी मुंबईतील गणेशभक्त मोठ्या प्रमाणात भेट देत आहेत. नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत संस्थापक असून नगरसेवक निशांत करसन भगत हे अध्यक्ष आहेत, हेमंत देसाई हे यंदाचे कार्याध्यक्ष असून



समाजसेवक संदीप भगत, नगरसेविका प्रिती संदीप भगत, फशीबाई भगत, वैजयंती भगत व रुपाली भगत हे कार्यवाहक आहेत. उत्सव साजरा होण्यासाठी श्रीबुद्धेश्वर चॅरिटेबल ट्रस्टचे योगदान लाभत आहे.

नामांकित रुग्णालये व अनुभव संपन्न डॉक्टर्स यांच्या उपस्थितीत आरोग्य शिबीरांचे आयोजन, शासनाच्या वतीने जेष्ठ नागरिकांना देण्यात येणारे सवलत प्रमाणपत्र नोंदणी व वाटप, जेष्ठ महिला –पुरुष कराओके स्पर्धा, लहान मुलांच्या क्रीडा व कला गुणांना वाव देणारे कार्यक्रम, अनंत चतुर्थीच्या एक दिवस महाप्रसादाचे आयोजन मंडळाच्या वतीने उत्सवा दरम्यान करण्यात आलेले आहे.

## मॉलमधील कपड्यांच्या दुकानात तीन लाखांचा अपहार

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीतील इनॉर्बिटमॉलमधील कपड्यांच्या दुकानात सुमारे तीन लाख रुपयांच्या अपहाराचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी दुकानाच्या मॅनेजरविरोधात वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

दुकानात मॅनेजर म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीने ग्राहकांनी खरेदी केलेल्या कपड्यांची रक्कम कंपनीकडे जमा न करता स्वतःकडे ठेवल्याचा आरोप आहे. ग्राहकांकडून विक्रीच्या मालाची रक्कम घेतल्यानंतर त्यांना कंपनीच्या संगणकीय प्रणालीतून बिल न देता त्यांना हस्तलिखित बिल देऊन संबंधित व्यवहार कंपनीच्या नजरेस येऊ नयेत, अशा पद्धतीने व्यवहार केल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

कंपनीने काही व्यवहारांची पडताळणी केल्यानंतर कंपनीच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यानंतर कंपनीच्या प्रतिनिधींनी वाशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीच्या आधारे इनॉर्बिटमॉलमधील कपड्यांच्या दुकानातील मॅनेजरविरोधात गुन्हा दाखल केला असून, अपहाराची नेमकी रक्कम आणि अशा प्रकारे किती व्यवहार करण्यात आले, याचा पोलिस तपास करीत आहेत .

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**नवी मुंबई : बातमीदार**

अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी २१ वर्षीय तरुणावर पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघेही एकाच महाविद्यालयात शिकणारे असून त्यांच्यात मैत्री आहे. शुक्रवारी रात्री मुलीचे आई–वडील गणपती दर्शनासाठी घराबाहेर गेले असताना मुलीने मित्राला घरी बोलावले. मात्र, काही वेळातच आई–वडील अचानक घरी परत आले असता त्यांना दोघेही आक्षेपार्ह अवस्थेत मिळून आले. त्यामुळे त्यांनी तरुणाला पोलिसांच्या ताब्यात दिले.पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## मनपा समाजमंदिराचे डिपॉझिट रखडले; नागरिक संतप्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहांचे व समाजमंदिरांचे डिपॉझिट (अनामत रक्कम) वेळेत परत न मिळाल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असून मनपा प्रशासनाने सदर डिपॉझिट त्वरित द्यावे अशी मागणी वचित बहुजन आघाडीचे बेलापूर तालुका अध्यक्ष ॲड. उमेश हातेकर यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या कडे केली आहे.

नवी मुंबईतील मनपा प्रशासन सभागृहासाठी भरलेले डिपॉझिट , कार्यक्रम पूर्ण होऊन अनेक महिने उलटून गेले तरी देत नाही . याबाबत वारंवार पाठपुरावा आणि लेखी



अर्ज करूनही सबंधित यांना मागील सहा – आठ महिने झाले तरी डिपॉझिटची रक्कम परत मिळालेली नाही .त्यामुळे नागरिकांना महापालिकेच्या कार्यालयाचे वारंवार फेरे मारावे लागत असून पैसे मिळवण्याच्या प्रयत्नात हवालदिल आहेत.

शहरातील सर्व प्रलंबित डिपॉझिट प्रकरणे तातडीने निकाली काढावीत आणि भविष्यात कोणत्याही मनपा सभागृहाचे डिपॉझिट कार्यक्रम संपल्यानंतर जास्तीत जास्त ३० दिवसांच्या आत संबंधित नागरिकांच्या बँक खात्यात जमा करण्याचा लेखी आदेश काढावा,

नागरिकांकडून डिपॉझिट वेळेत घेतले जाते, मग परतावा देताना महिनोनमहिने विलंब का? सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या पैशासाठी महापालिकेचे उंबरठे झिजवावे लागणे अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रश्नावर तातडीने निर्णय घेऊन नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी ॲड. उमेश हातेकर यांनी केली आहे.

## जुईनगर येथील निलगिरी सोसायटी मधील गटाराची तातडीने दुरुस्ती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



जुईनगर येथील निलगिरी सोसायटी, सेक्टर –२४ मधील गटार तुंबून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत होती. ॲड. नवीन प्रतापे यांनी या गंभीर समस्येकडे नवी मुंबई मनपाचे लक्ष वेधून सदर समस्या तातडीने मार्गी लावावी अशी मागणी केली होती. याची दखल घेत कार्यकारी अभियंता दीपक सूर्यराव यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी मलनिःसारण विभागाने गटाराची तातडीने दुरुस्ती केली.

गेल्या काही दिवसांपासून निलगिरी सोसायटीच्या बाहेरील मलनिःसारण वाहीनीचे मुख्य गटार पूर्णपणे तुंबलेले होते .त्यामुळे गटारातील दुर्गंधीयुक्त आणि दूषित पाणी रस्त्यावर न जाता थेट सदर सोसायटीच्या आवारात आणि पार्किंगमध्ये शिरत होते .या दूषित पाण्यामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली होती , त्यामुळे डासांचे प्रमाण वाढले . यामुळे सोसायटीतील लहान मुले, नागरिक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला .ऐन पावसाच्या दिवसात साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. प्रशासनाने या समस्येची त्वरित दखल घेऊन, तुंबलेल्या गटाराचे आणि सोसायटीत साचलेल्या पाण्याचे त्वरित कायमस्वरूपी निरसन केले .

## दिवाळे कोळीवाड्यात रंगला गौराईचा पारंपरिक सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

गौराईच्या आगमनाने दिवाळे कोळीवाड्यात गुरुवारी (ता. १७) पारंपरिक उत्साहाला उधाण आले. माहेरवाशीण गौराईचे स्वागत करण्यासाठी घराघरांत आकर्षक सजावट, फुलांची आरास आणि पारंपरिक पूजेची जय्यत तयारी करण्यात आली होती. जोत्स्ना कोळी, आशा कोळी आणि मीनाक्षी बोस यांच्या घरी नवसाच्या गौराईचे भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. पारंपरिक कोळी वेशभूषा, लखलखीत दागदागिने, मोत्याची नथ आणि फुलांनी सजविलेल्या गौराईचे मनोहारी रूप पाहण्यासाठी परिसरातील महिला व भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

गौराई म्हणजे माहेरवाशीण तिच्या पाहुणचारात कोणतीही



कमी पडू नये, यासाठी महिलांची सकाळपासूनच लगबग सुरू होती. घराघरांतून पारंपरिक फेऱ्यांच्या गाण्यांचे सूर घुमत होते. 'सरला श्रावण भादवा, आला गौराई माझी गेली पाण्याला...', 'सुपली सोन्याची...' अशा जुन्या गाण्यांच्या तालावर महिला गौराईभोवती फेर धरत होत्या. ढोलाच्या तालावर रंगलेला हा सोहळा म्हणजे आगरी–कोळी संस्कृतीची जिवंत आठवणच होती.

गौराईच्या ओवशाची परंपरा आजही कोळीवाड्यात मनोभावे जपली जाते. पाच प्रकारच्या भाज्या, वेलींची पाने, फळे, करंडा–फणी, खण–नारळाची ओटी आणि सुटे पैसे अशा साहित्याने भरलेली पाच सुपे गौराईसमोर ठेवली जातात. सुहासिनींकडून विधिवत पूजा करून भरलेले सूप गौराईसमोर तीन वेळा वर–खाली फिरवून ओवसा भरला जातो. तर नववधूचा पहिला ओवसा हा या परंपरेतील विशेष क्षण मानला जातो. माहेरच्या गौराईला ओवसा भरल्यानंतर सासरच्या गौराईसमोरही हीच परंपरा पार पाडली जाते.

दरम्यान, गौराईच्या निमित्ताने जपली जाणारी ही पूजा, फेऱ्यांची गाणी, महिलांचा फेर आणि ओवशाची परंपरा म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही, तर पिढ्यान्‌पिढ्या जपलेल्या आगरी–कोळी संस्कृतीच्या आणि जुन्या आठवणींच्या सुगंधाने दरवळणारा सोहळा आहे. काळ बदलला तरी गौराईच्या रूपाने आपल्या मातीशी जोडलेली ही नाळ अशीच जपली जावी, अशी भावना आशा विशाल कोळी यांनी व्यक्त केली.

## गावपणाची परंपरा जपत गणरायाला भावपूर्ण निरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

आधुनिकतेचा वेगाने विस्तार होत असलेल्या नवी मुंबईत गगनचुंबी इमारती, प्रशस्त रस्ते आणि बदलते शहरी जीवन दिसत असले, तरी या आधुनिक शहराच्या कुशीत आजही गावपणाची नाळ घट्ट जपली जात आहे. शहरातील मूळ गावठाणांमध्ये पिढ्यान्‌पिढ्या जपल्या गेलेल्या पारंपरिक रूढी–परंपरांचा प्रत्यय शनिवारी (ता. १९) पाच दिवसांच्या गणपती बाप्पांच्या विसर्जन सोहळ्यात पुन्हा एकदा आला.

गणरायाच्या आगमनापासून पाच दिवस भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघालेल्या गावठाणांमध्ये शनिवारी लाडक्या बाप्पांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. विशेष म्हणजे, आजही



अनेक मूळ गावठाणांमध्ये घराघरातील गणपती स्वतंत्रपणे न नेता डोक्यावर गणपती बाप्पांची मूर्ती घेऊन सामूहिक स्वरूपात विसर्जन मिरवणूक काढण्याची जुनी परंपरा जपली जाते. ढोल–ताशांचा गजर, टाळ–मृदंगाचा निनाद, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष आणि पारंपरिक वेशभूषेतील ग्रामस्थ यामुळे संपूर्ण गावठाण भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले.

गावातील प्रत्येक घराचा बाप्पा हा संपूर्ण गावाचा बाप्पा, हीच भावना या सामूहिक विसर्जनातून प्रकर्षाने जाणवते. घरातील गणरायाला डोक्यावर घेऊन ग्रामस्थ एकत्र येतात आणि पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढत विसर्जनस्थळी पोहोचतात. या सोहळ्यात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. एकत्र येणे, एकमेकांच्या सुख–दुःखात सहभागी होणे आणि सण–उत्सव सामूहिकपणे साजरे करणे, ही गावकीची संस्कृती आजही या गावठाणांनी जिवंत ठेवली आहे.

दरम्यान, गणरायाचे विसर्जन हा केवळ धार्मिक विधी न राहता गावातील एकोपा, बंधुभाव आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा भावपूर्ण सोहळा ठरला. नवी मुंबईच्या झपाट्याने बदलणाऱ्या शहरी जीवनातही गावठाणांनी आपल्या मातीशी जोडलेली ही परंपरा आजही जपली आहे. काळ बदलला, शहर बदलले, जीवनशैली बदलली; मात्र गणरायाला डोक्यावर घेऊन सामूहिक विसर्जन करण्याची गावपणाची ही अनोखी परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने आणि बाप्पाच्या जयघोषात भक्तिभावाने लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला.

## १४,३१८ श्रीगणेशमूर्तींसह २२३० गौरींचे भावपूर्ण विसर्जन

### शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करणाऱ्या नागरिकांचा पर्यावरणमित्र प्रशस्तिपत्राने सन्मान



**नवी मुंबई : बातमीदार**

दीड व पाचव्या दिवशी व्यवस्थित रितीने पार पडलेल्या विसर्जन सोहळ्याप्रमाणेच गौरींसह होणारा श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळाही अत्यंत भावपूर्ण वातावरणात २२ नैसर्गिक आणि १५६ कृत्रिम विसर्जन तलावांवर नवी मुंबई महानगरपालिकेने केलेल्या सुनियोजित व्यवस्थेमध्ये निर्विघ्नपणे संपन्न झाला. या विसर्जन सोहळयात १४,३१८ श्रीगणेशमूर्तींचे व २२३० गौरींचे भक्तीपूर्ण विसर्जन करण्यात आले. सर्वच ठिकाणी महानगरपालिकेने केलेल्या चोख व्यवस्थेमुळे तसेच सुसज्ज पोलीस यंत्रणेमुळे सर्व ठिकाणचे विसर्जन सुव्यवस्थित रितीने पार पडले.

महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी 'पर्यावरणपूरक प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव' साजरा करण्याचे आवाहन केले होते. त्याला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. २५९८ शाडूच्या श्रीमूर्तींचे विसर्जन करुन नागरिकांनी पर्यावरणाविषयी जागरुकता दाखविली. शाडूच्या मूर्ती प्रतिष्ठापना करणाऱ्या विसर्जनासाठी आलेल्या नागरिकांना महापौर व इतर पदाधिकारी आणि महापालिका आयुक्त यांच्या स्वाक्षरीचे स्वच्छता व पर्यावरणमित्र प्रशस्तिपत्र प्रदान करुन सन्मानित करण्यात आले. प्रशस्तिपत्राच्या माध्यमातून नागरिकांचे पर्यावरण जपणूकीबद्दल कौतुक करुन इतरही नागरिकांना त्यादृष्टीने प्रोत्साहित करण्याच्या संकल्पनेचे नागरिकांनी स्वागत केले. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६ फूटापेक्षा कमी उंचीच्या श्रीमुर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावे या आवाहनाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद लाभला.

## सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी वुशु स्पर्धेत चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व मुंबई उपनगर व ऑल मुंबई सबअर्बन वुशु असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित (१९ व २० सप्टेंबर) बी एम सी शाळा कांदिवली येथे झालेल्या विभागस्तरीय शालेय १७ ते १९ वर्षाखालील





मुले आणि मुली वुशु क्रीडास्पर्धेमध्ये नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर ज्युनिअर कॉलेजचा पार्थ प्रमोद निकम(११वी सायन्स) याने द्वितीय क्रमांक तर सार्थक प्रमोद दाभोळकर(११वी सायन्स)याने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.


या दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ,व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख , अध्यक्ष अरुण शेठ भगत , सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




अनिकेत गुडे, पनवेल



रामश्री मित्रमंडळ, नवीन पनवेल से. ६



पार्थ अमोल सकपाळ, चौक, खालापूर

# श्री गणेशा आरोग्याचा अभियान

## मुरूड येथे २५६ नागरिकांची तपासणी

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री गणेशा आरोग्याचा अभियान अंतर्गत मुरूड-जंजिरा येथील समुद्रकिनारी भारतीय तटरक्षक दलाच्या वतीने तसेच MJPJAY आयुष्य हॉस्पिटल, नांदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य आरोग्य तपासणी व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

आयुष्य हॉस्पिटलचे संचालक डॉ. ऋतुज माळी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात नागरिक, अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात एकूण २५६ लाभार्थ्यांची ओपीडी नोंदणी करण्यात आली. यामध्ये १६३ पुरुष, ७० महिला आणि २३ बालकांचा समावेश होता तसेच १९ जणांची उच्च रक्तदाबाची, १२ जणांची मधुमेहाची तपासणी करण्यात आली. याशिवाय ३ प्रयोगशाळा तपासण्या आणि १० ईसीजी तपासण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर लाभार्थ्यांना आवश्यक आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला तसेच विनामूल्य औषधोपचार करण्यात आले.




या उपक्रमास आयुष्य हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. नूतन माळी, संचालक डॉ. ऋतुज माळी, वैद्यकीय संचालक डॉ. अनिल गोस्वामी, डॉ. सलमान पांगारकर, MJPJAY Scheme MEDCO अवधूत कवळे आणि प्रतीक्षा माळी उपस्थित होते.

आरोग्य तपासणीसोबतच मुरूड-जंजिरा समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध अधोरेखित करत नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. गणेशोत्सवच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी, स्वच्छता आणि आरोग्य जनजागृतीचा संदेश देणारा हा उपक्रम राबविण्यात आला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या राष्ट्रसेवेला सलाम

## तळा येथे उजळला आशीर्वादाचा दिवा

**तळा : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने तळा शहरातील नमो उद्यानातील लायटया मारुती मंदिरात महाआरतीचे आयोजन आणि रोजी पंतप्रधान मोदी यांच्या पंचवीस वर्षांच्या सेवेनिमित्त आशीर्वादाचा दिवा हा विशेष कार्यक्रम भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. घरोघरीही दीप प्रज्वलन करण्यात आले.




या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रसेवेप्रती नमन करण्यात आले.त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत विकसित भारताच्या संकल्पासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी तळा परिसर व तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिक दीप प्रज्वलित करण्यासाठी आणि महाआरतीमध्ये सहभागी झाले होते.

भाजप मंडळ अध्यक्ष कैलास पायगुडे व अभियान संयोजक, ॲड.चेतन चव्हाण, ओबीसी जिल्हाध्यक्ष ॲड. निलेश रातवडकर युवा मोर्चा अध्यक्ष राकेश कासार, वैभव कदम, सुयोग बारटक्के, महिला मोर्चाच्या जिया लोंढे, नगरसेविका ॲड.दिव्या रातवडकर, किशोर वेदक, मोरेश्वर गोरिवले व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. त्याचप्रमाणे शिवसेना शहराध्यक्ष राकेश वडके, नमित पांढरकामे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते परशुराम सुतार, रमेश कोलवणकर, सुरेश शिंदे उपस्थित होते.

# माणगाव भाजप कार्यालयाचा उद्या उद्घाटन सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या माणगाव मध्यवर्ती कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा येत्या बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश चिटणीस तथा पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील (पेण), विधान परिषद आमदार विक्रांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर दक्षिण रायगड भाजपचे सरचिटणीस सतीश धारप, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी आमदार शाम सावंत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील, सरचिटणीस प्रशांत शिंदे, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती वैकुंठ पाटील यांच्यासह इतर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन भाजप नेते पंकज तांबे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# लोककलेची परंपरा : शक्ती-तुऱ्याचे सामने आणि बाल्या नृत्याचा अविष्कार

**पाली : प्रतिनिधी**

गणरायाच्या आगमनाने ढोलकीचा ताल, टाळांचा गजर आणि जाखडी नृत्याची रंगत पाहायला मिळत आहे. याच परंपरेचा अनोखा आविष्कार सुधागड तालुक्यातील नाडसूर येथे अनुभवायला मिळाला. तेथे आयोजित भव्य शक्ती-तुरा सामन्याने आणि बाल्या नृत्याच्या आवर्तनांनी प्रेक्षकांची मने जिंकली.



सुधागड पंचायत समितीचे उपसभापती तथा राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संदेश परशुराम शेवाळे यांच्या वतीने नाडसूर येथील वैतागवाडी येथे या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी २ वाजता सुरू झालेल्या या लोककलेच्या सोहळ्यात तांडदेव घराण्याचे तुरेवाले शाहीर योगेश जाधव (मु. पहूर-रोहा) आणि भानुदास घराण्याच्या शक्तिवाल्या वृदाली दळवी (महाडिक) यांच्यात कलगीतुऱ्याची चुरशीची जुगलबंदी रंगली. पौराणिक कथा, आध्यात्मिक चिंतन आणि लोकसंगीत मिलाफातून रंगलेल्या या सामन्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दुसरीकडे, कोकणातील पारंपरिक बाल्या नाच, जाखडी नृत्य, भजन आणि कीर्तनाचे ताफ गावोगावी सक्रिय आहेत. आधुनिकतेच्या युगात लोप पावत चाललेल्या या कलेला पुन्हा जिवंत ठेवण्यासाठी तरुण पिढी पुढे आली आहे. सुधागड तालुक्यातील श्री दत्तगुरु नाच मंडळ आणि चव्हाणवाडी ग्रामस्थ मंडळाने तब्बल २२ वर्षांनंतर जाखडी नृत्याची परंपरा पुनरुज्जीवित केली आहे. पेण तालुक्यातील दुरशेत येथील सुशिक्षित तरुणही मागील १६ वर्षांपासून कला जोपासत आहे.

# गणेशोत्सवाच्या माध्यमातून जनकल्याणाचा सेतू : लोकसंवाद उपक्रमातून शासकीय योजना घराघरात!

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारतीय संस्कृती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या विचारांचा वारसा लाभलेला गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून सामाजिक प्रबोधन, प्रबोधनात्मक संवाद आणि जनसामान्यांच्या एकोप्याचे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. याच लोकोत्सवाचा सकारात्मक आणि रचनात्मक उपयोग करत सामान्य नागरिकांच्या दारापर्यंत विविध शासकीय योजना आणि लोककल्याणकारी सेवा पोहचवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने लोकसंवाद-२०२६ हा अत्यंत नाविन्यपूर्ण आणि पथदर्शी उपक्रम हाती घेतला आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा तसेच तालुकास्तरीय सर्व शासकीय विभागांच्या सक्रिय समन्वयाने हा उपक्रम सोमवारपासून पुढील चार दिवस संपूर्ण जिल्ह्यात अत्यंत व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे.

लोकसंवाद या अभिनव उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना प्रशासनाने नागरिकांच्या उत्स्फूर्त गर्दीचा सुवर्णयोग साधला आहे. गणेशोत्सवादरम्यान भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने लाडक्या बाप्पाच्या दर्शनासाठी मंडपांमध्ये येतात. या गर्दीच्या आणि सोयीस्कर वेळेचा सदुपयोग करून थेट जनतेशी थेट सुसंवाद प्रस्थापित करणे हे या उपक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली विविध शासकीय विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी जिल्ह्यातील प्रमुख, मानाच्या तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी स्वतः उपस्थित राहून उपस्थित नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर व सुलभ भाषेत माहिती देतील.

### नागरी सुविधा, योजनांची माहिती

या उपक्रमांतर्गत नागरिकांना शासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा सेवा संकल्प, एसआयआर, महसूल विभागातील विविध दाखले, फेरफार व ऑनलाईन सेवा तसेच शहरी भागातील महानगरपालिका व नगर परिषदेच्या नागरी सुविधांची विस्तृत माहिती दिली जाणार आहे. याशिवाय पर्यावरण संवर्धन, शिक्षण क्षेत्रातील विविध शिष्यवृत्ती व योजना, सामाजिक न्याय विभाग आणि क्रीडा विभागाच्या कल्याणकारी योजना, बेरोजगारांसाठी सुवर्णसंधी देणारा रोजगार महाकुंभ, आरोग्यविषयक श्री गणेशा आरोग्याचा मोहीम आणि गंभीर रुग्णांना संजीवनी देणारा मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसारख्या अतिशय संवेदनशील व लोकोपयोगी योजनांची सखोल माहिती नागरिकांना एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येत आहे.

याचप्रमाणे सद्य:स्थितीतील वाढत्या डिजिटल गरजा लक्षात घेऊन महिला व बालविकास विभागाच्या योजनांसोबतच सायबर सुरक्षा, दैनंदिन सुरक्षित डिजिटल व्यवहारांचे ज्ञान, विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या विविध नाविण्यपूर्ण सेवा-सुविधांचा परिचयही या संवादादरम्यान करून दिला जाणार आहे. प्रत्येक मंडळाच्या ठिकाणी किमान तीन ते चार प्रमुख योजनांची एका वेळी सविस्तर माहिती देऊन जनतेचे प्रबोधन केले जाईल.

या उपक्रमाची व्यापकता अधिक वाढवण्यासाठी प्रत्येक सादरीकरणाचे जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयाच्या अधिकृत सोशल मीडिया हँडल्स तसेच सर्व प्रमुख वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांच्या माध्यमातून यास व्यापक प्रसिद्धी दिली जाणार आहे.

प्रशासकीय पारदर्शकता आणि गतिमानतेचा आदर्श प्रस्थापित करणाऱ्या या मोहिमेत माहिती व जनसंपर्क विभाग, जिल्हा माहिती कार्यालय तसेच सर्व जिल्हा व तालुकास्तरावरील प्रशासकीय कार्यालयांची भूमिका अत्यंत कौतुकास्पद ठरत आहे. अत्यंत सुनियोजित समन्वय साधून हाती घेण्यात आलेला हा उपक्रम शासकीय योजना आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यातील दुवा अधिक घट्ट करणारा ठरेल यात शंका नाही. जिल्ह्यातील अनेक नामांकित गणेशोत्सव मंडळांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले असून, प्रशासकीय अधिकाऱ्यांना आपल्या मंडपात जागा उपलब्ध करून देण्यासाठी उत्स्फूर्त तयारी दर्शविली आहे.

जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व शासकीय विभाग प्रमुख, तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्ह्यातील सर्व गणेशोत्सव मंडळांना जाहीर आवाहन करण्यात आले आहे की, सोमवारपासून पुढील चार दिवस चालणाऱ्या या महा-उपक्रमात सर्वांनी पूर्ण क्षमतेने, जबाबदारीने आणि उत्साहाने पुढाकार घ्यावा. आपापल्या संपर्कातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांशी समन्वय साधून मंडपाच्या दर्शनी, सुयोग्य व सुरक्षित ठिकाणी 'लोकसंवाद २०२६'चे माहिती फलक व बॅनर लावावेत आणि बाप्पाच्या चरणी येणाऱ्या प्रत्येक नागरिकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहचवून हा उत्सव खऱ्या अर्थाने जनकल्याण पर्व म्हणून यशस्वी करावा.

**खालापूर : येथील पोलीस ठाण्यात पोलीस बॉईज मित्रमंडळाने स्थानापन्न केलेल्या गणरायाचे पोलीस पाटील तालुका अध्यक्ष अनंता ठोंबरे, पोलीस पाटील प्रमोद किलंजे, संजय बारस्कर यांनी दर्शन घेतले. सोबत पोलीस कर्मचारी अमोल पाटील, गडदे, पत्रकार दीपक जगताप.**



# वसतिगृह व स्वयंम योजनांच्या प्रवेश अर्जांना ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग तसेच संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पं. दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली आहे. आता विद्यार्थ्यांना दि. ३० सप्टेंबर २०२६पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहेत.

बारावीनंतर व्यावसायिक तसेच अव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या योजना राबविण्यात येतात. यामध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना (OBC/SBC/VJNT/NT-A, B, D) तसेच पं. दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना (NT-C) यांचा समावेश आहे. या योजनांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर सुरू करण्यात आली आहे.

ऑनलाइन अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी येत असल्याने नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्यात आला आहे. त्यानुसार व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील पात्र विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपूर्वी ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

ऑनलाइन अर्ज भरताना तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, रायगड-अलिबाग कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक संचालक सुनील जाधव यांनी केले आहे.

# मुरूडमध्ये गणेशोत्सवातून अवतरला शिवकाळ!

## मकू कुटुंबीयांची हिंदवी स्वराज्याच्या शिलेदारांना मानवंदना



**मुरूड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात सध्या मुरुडमधील शिवाजीनगर कोळीवाडा परिसर शिवभक्ती आणि राष्ट्रभक्तीने रसरसून निघाला आहे. दरवर्षीप्रमाणे गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम करणाऱ्या येथील मकू कुटुंबीयांनी आपल्या घरगुती गणेशोत्सवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा एक जिवंत आणि धगधगता इतिहास भाविकांसमोर उभा केला. 'शिवरायांचे निष्ठावंत शिलेदार!' या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेवर आधारित असलेल्या या आराशीने संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले.

नव्या पिढीला स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर शिलेदारांच्या शौर्य, त्याग आणि पराक्रमाची प्रेरणा मिळावी, हा या सजावटीमागील मुख्य उद्देश आहे. यासाठी मकू कुटुंबीयांनी शिवकालीन इतिहासाला अनुरूप अशी अत्यंत देखणी छायाचित्रे, ऐतिहासिक किल्ल्यांची आणि स्थळांची हुबेहूब दृश्ये साकारली आहेत. यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केलेल्या दृक्-श्राव्य मांडणीमुळे येथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाला थेट शिवकाळात गेल्याचा अनुभव मिळत आहे.

या अभिनव उपक्रमाची मूळ संकल्पना जितेंद्र मकू यांची असून त्याला उल्हास मकू यांनी आपल्या उत्कृष्ट कलाकुसरीने सजावटीचे मूर्त रूप दिले आहे. या भव्य आराशीसाठी विधी, वंश, ऋचीला, रिद्धी ऋणी,स्पृहा, वेद , स्मित हर्ष आर्वी बल्लाळ देवश्री, स्मिरा स्निती रिधांश, अश्वी, शिवाय आणि साईश या मकू कुटुंबीयांच्या तरुण शिलेदारांनी सजावटीची संपूर्ण धुरा जबाबदारीने सांभाळली आहे. चेतन मकू यांच्या प्रभावी निवेदनासह महेश कवळे यांच्या ओघवत्या लेखनाने या संपूर्ण देखाव्यात अधिक भर घातली आहे.

तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, शिवा काशिद यांसारख्या अनेक वीर मावळ्यांची स्वराज्याप्रती असलेली अढळ निष्ठा तरुण पिढीला अंतर्मुख करणारी आहे. इतिहासाची सुवर्णपाने उलगडणाऱ्या आणि मनामध्ये राष्ट्रप्रेमाची ठिणगी चेतवणाऱ्या या बाप्पाच्या दर्शनासाठी आणि मकू कुटुंबीयांच्या कलाकृतीचे कौतुक करण्यासाठी समाजातल्या सर्वच स्तरांतून भाविकांची गर्दी होत आहे.



**पोलादपूर : गौरी गणपती विसर्जनादरम्यान सावित्री नदीच्या घाटावर नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी निर्माल्याचे संकलन केले.** (छाया : शैलेश पालकर)

